# खिस्ताचे जीवन

## सचित्रीत

**The Life of Christ** *Illustrated* **- Marathi**



11

# खिस्ताचे जीवन

## सचित्रीत

The Life of Christ *Illustrated* - Marathi


Script by Iva Hoth
Illustrations by Andre Le Blanc
Bible Editor, C. Elvan Olmstead, Ph.D.



*Cook Communications*
*Ministries International*

# The Life of Christ Illustrated

## Marathi Edition

Copyright 2015 Voice Media

info@VM1.global
Web home: www.VM1.global

All rights reserved. No part of the publication may be reproduced, distributed or transmitted in any form or by any means, including photocopying, recording, or other electronic, or mechanical methods, without the prior written permission of the publisher, except in the case of brief quotations embodied in critical reviews and certain other noncommercial uses permitted by copyright law. For permission requests, email the publisher, addressed “Attention: Permission Coordinator,” at the address above.

This publication **may not be sold, and is for free distribution** only.

# येशूचे जीवन

मत्तय, मार्क, लूक आणि योहान यामधून घेतले आहे

नवीन कराराच्या प्रथम चार पुस्तकाला शुभवर्तमान असे म्हटले जाते. ज्याचा अर्थ येशूबद्दल, त्याच्या जीवनाबद्दल, त्याच्या शिकवणीबद्दल, मरणाबद्दल आणि पुनरूत्थानाबद्दल "चांगली बातमी" असा होतो. ही पुस्तके अनेक रीतीने सारखी असल्याकारणाने सर्व सत्य एकत्रीत करून एक वस्तुस्थिती सांगण्याचा प्रयत्न केला आहे.



# ते जग ज्यामध्ये येशू आला.










परंतु आई.कां बरे ?
हा कायदा आहे. रोमी शिपाई यहूदी लोकांना कितीपण जड वस्तू लांबपर्यंत नेण्यासाठी सांगू शकतात हे बरोबर नाही. परंतु रोमी ..
रोमी ! ते आपल्याला प्रत्येक गोष्टीसाठी कर लावतात. परंतु आपल्याला आपल्या सरकारपुढे आवाज काढता येत नाही. मागील महान दावीद राजाच्या दिवसात आपण राज्यकर्ते होतो.
ओह ! कोणीतरी तुमचे ऐकायला हवे.
हे देवा, तूं आम्हाला मुक्तीदाता पाठविणार म्हणून वचन दिले होते. तो केव्हा येईल?
मलाखी भविष्यद्वक्ता म्हणाला आपल्या मुक्तीसाठी, मार्ग तयार करण्यासाठी देव कोणाला तरी प्रथम पाठविल.. आणि तो मदतनीस अजून आलेला नाही.


त्या दुपारी यरूशलेमेतील यहूदी प्रार्थनेसाठी यरूशलेमेत मंदिरात जमले असतांना एक मुख्य याजक जखऱ्या ह्याने पवित्र स्थानात प्रवेश केला आणि सुगंधीत द्रव्य दिले.
हा माझ्या जीवनातील महान दिवस आहे. एवढ्या वर्षानंतर, शेवटी देवाच्या पवित्र वेदीवर यज्ञ अर्पण करण्याची माझी पाळी आहे.
तो बराच वेळ गुप्त खोलीत राहिला तेव्हा अनेक लोकांना आश्चर्य वाटले.
मोठ्या याजकापेक्षा जखऱ्याची प्रार्थना लांब आहे
हा चांगला मनुष्य आहे. त्याची जागा घेण्यासाठी त्याला एकही मुलगा नाही. ही फारच वाईट गोष्ट आहे.
शेवटी जखऱ्या लोकांकडे बाहेर आला परंतु तो बोलू शकत नव्हता.
देवाच्या पवित्र ठिकाणी काय घडले ?

# देवापासून मिळालेले गुपित

लूक १: २३-५५







मुलगा ! आणि तो देवाच्या निवडलेल्या करिता मार्ग तयार करील !
परंतु जखऱ्या, तुम्ही मला हे सांगण्याऐवजी लिहून कां दाखविले ?
जखऱ्याने दुसरी गोष्ट लिहिली व आपल्या पत्नीस वाचण्यास दिली.
देवाने मला क्षमा केली. मी देवदूताच्या संदेशावरती अविश्वास केला आणि तो मला म्हणाला जेव्हापर्यंत हा संदेश खरा होत नाही तोपर्यंत मी बोलू शकणार नाही.
अत्यानंद होवून....आणि देवाने जो त्यांच्यामध्ये विश्वास ठेवला त्याने प्रेरीत होऊन जखऱ्या आणि एलिझाबेथ ह्यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची तयारी केली. त्या महिण्यामध्ये ते नेहमी दोघेही मिळून वचन वाचीत असे व देवाचे वचन त्याच्या लोकांना सांगत होते.
वृद्ध याजक आणि त्याची पत्नी त्यांच्या येणाऱ्या मुलाविषयी वाट पाहत असता गब्रीएल दुताने एलीझाबेथच्या नात्यात असलेल्या मरीयेला जिचे वाग्दान योसेफासोबत झाले होते त्या मरीयेला दर्शन दिले. योसेफ हा नासरेथचा सुतार काम करणारा होता.
भिऊं नको मरीये, देवाने त्याच्या पुत्राची आई होण्यासाठी तुला निवडले आहे. ज्याचे नाव "येशू" राहील. तो असा होईल ज्याच्या राज्याचा अंत कधीच होणार नाही.
मी प्रभूची दासी आणि मी तो जसे सांगेल तेच करीन.


मरीयेने देवदूताचा हा संदेश कोणालाच सांगितला नाही परंतु ती काही दिवसानंतर योसेफाला बघण्यासाठी त्याच्या दुकानावर गेली.
माझ्या नात्यात असलेल्या एलिझाबेथला जाऊन भेटण्याचे मी ठरवले आहे.
यहूदामध्ये ? मरीये तूं एकटी जावे असे मला वाटत नाही. जर आपली मागणी होऊन आपले लग्न झाले असते तर मी तुला तेथे घेऊन गेलो असतो.
परंतु मरीयेने एकटेच नासरेथ सोडले.
देवदूत म्हणाला की एलिझाबेथला पण मुलगा होणार आहे, तुझे तिच्याशी बोलणे हिताचे होईल.
जेव्हा ती तिच्या घरी पोहंचली..
मरीये, किती आश्चर्यरीतीने देवाने तुला आशीर्वादीत केले ! परंतु मला सांग, माझ्या प्रभूच्या मातेने मला भेट देण्यासाठी का यावे ?
या स्वागताने मरीयेला समजले की एलिझाबेथने तिचे आश्चर्यकारक गुपित मरीयेला सांगितले मोठ्या आनंदाने तिने देवाची स्तुति केली.
माझा आत्मा प्रभूला थोर मानतो. कारण तो जो सामर्थी आहे त्याने माझ्यासाठी खूप मोठ्या गोष्टी केल्या आहेत आणि त्याचे नाव पवित्र आहे.


पित्याचे भविष्य
लूक १: ५७-८० २:१-५
वृद्ध जखऱ्याच्या घरी दिवस निघून गेले त्याची पत्नी एलिझाबेथ आणि तिच्या नात्यात असलेली मरीया यांनी देवाने त्यांना जे वचन दिले होते त्यावर पुष्कळ वेळ बोलण्यात घालविला. जेव्हा एलिझाबेथ आणि जखऱ्याचा मुलगा जन्मला, त्यांचे शेजारी आणि नातेवाईक त्यांना पाहायला आले.
त्याचे नाव राखण्यासाठी जखऱ्याला मुलगा झाला त्याबद्दल त्याला किती अभिमान आहे.
त्याला मुलगा झाल्याबद्दल फार अभिमान आहे. पण त्या बाळाचे नाव 'योहान' आहे.
योहान ? तुमच्या कुटुंबापैकी कोणते नाव त्याला देत नाही कां ?
जखऱ्याने देवदूताच्या संदेशावर जो त्याच्या मुलाच्या जन्माविषयी होता, त्यावर विश्वास ठेवला नाही; तेव्हापासून तो एकही शब्द बोलण्यास समर्थ नव्हता. लगेच त्याने कागदावर त्याचे उत्तर लिहिले व त्या स्त्रिला वाचण्यास दिले.
त्याचे नाव 'योहान' आहे.


अशारीतीने लहान बाळाचे नाव देवदूताने सूचना दिल्याप्रमाणे ठेवले आणि त्याच घटकेस जखऱ्या बोलूं लागला.
इस्राएलाचा प्रभू धन्यवादीत असो कारण त्याने आपल्या लोकांची भेट घेतली व त्याची खंडणी भरून सुटका केली......आणि तुला महान संदेष्टा म्हणतील कारण प्रभूचे मार्ग सिद्ध करण्याकरिता तूं त्याच्यासमोर चालशिल.


लोक घरी जात असतांना रस्त्याने जखऱ्याच्या मुलाच्या जन्माविषयी आश्चर्यरीतीने बोलत होते.
'योहान' या नावाचा अर्थ काय होतो ?
ह्याचा अर्थ "देव कृपाळू आहे" देवाचा त्या मुलाविषयी एक विशेष उद्देश असावा.


नासरेथच्या आपल्या घरी मरीया परत तिला होणाऱ्या मुलाच्या उद्देशाविषयी विचार करूं लागली. परंतु योसेफ सुतार ज्याच्याशी तिची मागणी झाली होती. देवदूताने मरीयेला होणाऱ्या बाळाविषयी जे सांगितले होते त्याविषयी त्याला काहीच माहीत नव्हते. एके रात्री देवदूत त्याच्याकडे आला.
देवाने त्याच्या मुलाची आई होण्यासाठी मरीयेला निवडले. त्याचे नाव येशू ठेव. तो त्याच्या लोकांना त्यांच्या पापापासून सोडविल.


दुसऱ्या दिवशी सकाळीच योसेफ मरीयेकडे गेला.
मरीये, काल रात्री माझ्या स्वप्नात देवदूत आला आणि मला म्हणाला की तूं देवाची आई होणार आहेस. मला आता असे कळले की देवाने मला तुझी आणि तुझ्या बाळाची काळजी घेण्यासाठी निवडले.
म्हणून मरीया आणि योसेफ दोघांचे लग्न झाले आणि ते योसेफाच्या घरी जे सुतारीच्या दुकानाच्या बाजूला होते तिथे गेले. संध्याकाळी जेव्हा त्या दिवसाचे काम झाले तेव्हा त्यांनी माडीवर जाऊन ताऱ्याकडे बघत देवाने मरीयेला दिलेल्या वचनाबद्दल बोलताना विश्रांती घेतली.
परंतु एकेदिवशी योसेफ बाजारातून एक वाईट बातमी घेऊन आला. कैसर औगुस्तने अशी आज्ञा केली होती की सर्वांनी आपआपल्या गावी जाऊन नावनिशी लिहावी. योसेफ आणि मरीया यांना दावीदाच्या बेथलेहेम या गावी जावे लागले.
परंतु आता मी जाऊं शकत नाही व तुला सोडूपण शकत नाही
योसेफ, तुम्हाला जावे लागेल आणि मी तुमच्या सोबत येईल तुम्ही काळजी करूं नका... देव आपल्या सोबत राहील.
नावनिशी लिहून झाल्यावर ते बाहेर आले. रस्त्यावर त्यांना अनेक लोक भेटलीत परंतु त्यांचा प्रवास बऱ्याच दिवसाचा होता. काही वेळानंतर मरीया व योसेफ मागे राहिले. बेथलेहेमला पोहंचण्याच्या बेतातच होते.
आम्ही फार लांबून प्रवास करून आलो आहो आणि माझी पत्नी फारच थकलेली आहे. मला खोली पाहिजे.
मला क्षमा करा. ह्यावेळेस बेथलेहेमात फारच गर्दी आहे याठिकाणी एकही खोली नाही.


स्वर्गदूतांचे गाणे
लूक १ :२३-५५
नासरेथाहून खूप थकलेला प्रवास केल्यानंतर मरीया व योसेफ बेथलेहेमात येऊन पोहंचले परंतु संपूर्ण शहरात खूप भीड होती. तेव्हा तिथे त्यांच्यासाठी एकही खोली शिल्लक नव्हती.
माझ्या पत्नीला आता लवकरच मूल होणार आहे. तुमच्याकडे तिने विश्रांती घ्यावी अशी एकही जागा नाही कां ?
ह्या रात्री नाही. परंतु थांबा.....माझ्या तबेल्यात रिकामी जागा आहे. जर....
घेऊन घ्या, योसेफ. फार उशीर झालेला आहे आणि मी फार थकलेली आहे.
मरीये ही जागा तुझ्यासाठी योग्य नाही.
काही हरकत नाही, योसेफ डोके टेकण्यासाठी आपल्याला ही जागा मिळाली आहे त्याबद्दल मी धन्यवादीत आहे.


त्याच रात्री काही मेंढपाळ शहराच्या बाहेर पर्वताकडे आपली मेंढरे राखीत होते ते बेथलेहेमात झालेल्या गर्दीविषयी बोलत होते.
मी असे ऐकले आहे की कैसर औगुस्तने नावनिशी लिहिण्याची आज्ञा दिली जेणेकरून तो अधिक कर वसूल करू शकेल. काय आपण कधीहि या जुलमी राजापासून मुक्त होऊं शकणार नाही कां ?
देवाने आपल्याला मुक्ती दात्याविषयी वचन दिले आणि मी माझ्या संपूर्ण आयुष्यात हीच प्रार्थना केली की मी त्याला पाहण्यासाठी जगेल
अचानक... एक मोठा प्रकाश त्यांच्यावर पडला.
हे काय आहे ?
ह देवा, आम्हाल वाचीव.
घाबरू नका; कारण मी तुमच्याकडे सर्व लोकांना आनंद होईल अशी बातमी घेऊन येत आहे. तुमच्यासाठी दावीदाच्या नगरात भाज तारणारा जन्मला आहे. तो ख्रिस्त प्रभू आहे. गव्हाणीत निजवलेले असे बाळ तुम्हाला गोठ्यात आढळेल.


नंतर आकाशात स्वर्गातील सैन्याचा समुदाय प्रकट झाला व ते देवाची स्तुति करीत म्हणाले.
उर्ध्वलोकी देवाला गौरव आणि पृथ्वी ज्यांच्यावर त्याचा प्रसार झाला आहे त्या मनुष्यास शांति.
देवदूत गेले....आणि तो सुंदर प्रकाश नाहीसा झाला पुन्हा एकदा तेथे अंधार झाला आणि तो बेथलेहेमाच्या पर्वतावर पसरला.
मी गुप्तरीतीने जे काही पाहिले व जे काही ऐकले त्यावर विश्वास ठेवू शकतो. देवाने आपला मुक्तीदाता, आपला तारणारा या रात्री पाठविला आहे!
आणि विचार करा त्याने आपले देवदूत, ही बातमी सांगण्यासाठी आपल्यासारख्या गरीब मेंढपाळाकडे पाठविले.
देवदूताने म्हटले तारणारा आपल्याला गव्हाणीत आढळेल चला आपण थलेहेमात जाऊं आणि त्याला पाहूं
आश्चर्याने आणि उत्सुकतेने मेंढपाळ घाईने बेथलेहेमास गेले फाटकामधन ते गव्हाणीकडे गेले.....
पाहा,....तेथे गोठ्यात प्रकाश आहे!
आपला तारणारा येथे आहे! आणि मी त्याला पाहायला जात आहे!

## राजा जन्मला आहे

लूक २:७, १६-२०; मत्तय २:१-८







ते आपल्या कळपात गेले आणि त्या रात्री जे काही घडले त्याबाबत देवाची स्तुति करीत राहिले. त्याच घटकेस पूर्वेकडील फार लांबच्या प्रदेशात ज्ञानी लोकांनी नुकतेच बघितलेल्या एका अद्भूत गोष्टींविषयी विचार करीत होते.
जो नवीन तारा...सर्व ताऱ्यांपेक्षा जास्त प्रकाश देत आहे. याला नक्कीच काहीतरी विशेष अर्थ असावा.
यहूदी लोकांचा महान राजा जन्माला आला आहे त्याचे हे देवापासूनचे चिन्ह आहे.
चला आपण यरुशलेमेला जाऊं आणि राजाला पाहूं.
अनेक महिनें प्रवास केल्यानंतर ज्ञानी मनुष्य यरुशलेमेला पोहंचले.
आम्ही यहूदाचा जो राजा जन्मास आला आहे त्याला नमन करण्यास आलो आहो. कृपाकरुन तो कोठे मिळेल आम्हाला सांगा.
तुमचा काही तरी गैरसमज होत आहे. सध्या या ठिकाणी कोणताही राजा जन्माला आला नाही.

**जे**व्हा हेरोदाच्या राजवाड्यात ज्ञानी लोकांनी विचारपूस केली. तेव्हा हेरोद राजा ज्याने त्याचे राजासन सांभाळण्यासाठी एकापेक्षा अधिक खून केले होते. तो घाबरला त्याने मुख्य याजक आणि शास्त्र्यांना बोलविले.









# रात्रीतून पलायन करणे

मत्तय २:९-१४

हेरोदाची सुचना घेऊन ज्ञानी पुरुष बेथलेहेमास गेले. यरुशलेम सोडताच त्यांनी जो तारा पूर्वेकडे पाहिला होता तोच तारा त्यांनी परत पाहिला. त्यांना तो बेथलेहेमाकडे घेऊन गेला आणि तेथे...




बेथलेहेमच्या लोकांना त्या अनोळखी महान पुरुषांना योसेफ आणि मरीया ज्या घरी थांबले होते त्या घरासमोर थांबल्यावर आश्चर्य वाटले. जेव्हा ज्ञानी पुरुषांनी त्यांच्या येण्याचे कारण सांगितले तेव्हा त्यांनी त्यांना आत बोलाविले. त्यांनी येशू बाळाला वाकून नमन केले.




त्याच रात्री ज्ञानी पुरुषांनी त्यांच्या परत जाण्याची योजना केली.
मला आनंद वाटतो की आपण यरुशलेमला परत जाऊ शकतो आणि बाळ कुठे मिळेल हे हेरोद राजाला सांगू शकतो.


दुसऱ्या दिवशी सकाळीच....
मला स्वप्न पडले–
देवाने आम्हाला स्वप्नात यरुशलेमेला न जाण्याची ताकीद दिली कारण हेरोद हा द्वेषी आहे आणि त्याला त्या बाळाला मारुन टाकण्याची इच्छा आहे.
मला पण तेच स्वप्न पडले. हेरोदाला आपल्यापासून काहीच न कळण्यासाठी आपण दुसऱ्या मार्गाने जाऊ.


देवदूताला हेरोदाच्या रागाविषयी फक्त ज्ञानी माणसांनाच सांगायचे नव्हते तर देवाच्या देवदूताने योसेफालाही दर्शन दिले.....


मरीये, आपल्याला इथून इजिप्तला जायला हवे असे स्वप्नात मला देवदूताने सांगितले. हेरोद येशूला मारुन टाकणार आहे.
येशूला मारणार! नाही, नाही !


मध्यरात्री योसेफ, मरीया आणि येशूबाळ ह्यांनी गुप्तरीतीने शहर सोडले.


यरुशलेमेत हेरोद ज्ञानी लोकांची वाट पाहात होता. जेव्हा ते आले नाही. त्याला असे वाटले की ते त्याच्यापासून बाळाचे संरक्षण करणार आहे.
ते बाळ माझे सिंहासन घेण्यासाठी कधीहि जिवंत राहणार नाही. त्याला मारण्यासाठी मी बेथलेहेमातील प्रत्येक मूल मारुन टाकील.

# मंदीरात येशू बाळ

मत्तय २:१६-२३ लूक २:४०-५२

येशूबाळ आपली जागा घेईल या भीतिने हेरोद राजाने बेथलेहेमातील सर्व मुलांना मारुन टाकण्याची आज्ञा दिली. परंतु योसेफ मरीया येशूबाळासोबत इजिप्तला गेले. काही महिन्यानंतर देवदूताने योसेफला दर्शन दिले की हेरोद मरण पावला आहे. आणि येशूला आपल्या नासरेथ या गावी घेऊन जाण्यासाठी आता कोणताच धोका नाही...




योसेफ आपल्या सुताराच्या दुकानावर जायचा आणि जसे जसे वर्ष जात होते तसे येशू आपल्या वडिलांना मदत करण्याचे शिकला. जेव्हा काम संपत असे तेव्हा येशू शहराच्या मोठ्यांकडून शिक्षण घ्यावचा.
दावीद राजाच्या दिवसात आपण राज्यकर्ते होतो.
होय, परंतु त्यादिवसामध्ये लोकांनी देवाची आज्ञा पाळली. आज अनेक लोक त्याच्या वचनाकडे दुर्लक्ष करीत आहे.


परंतु योसेफ आणि मरीया हे देवाचे वचन पाळीत होते आणि येशूलापण देवाचे वचन पाळण्यासाठी शिकवित होते. इजिप्तमध्ये असलेल्या त्यांच्या पुर्वजांना देवाने मुक्त केल्याबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रत्येक वर्षी यरुशलेमेमध्ये वसंत ऋतूत वल्हांडणाच्या सणाला ते यरुशलेमेमध्ये उपस्थित राहत असे. नासरेथाहून तांड्यामध्ये ते आपला प्रवास करीत होते. त्यामध्ये येशूशिवाय कोणीहि उत्साही नव्हते.


ह्यावर्षी जेव्हा तो मंदिरात भक्ती करण्याकरिता जातो तेव्हा तो यहूदी शिक्षकांना पुष्कळसे प्रश्न विचारण्याचा विचार करतो.


सण झाल्यानंतर लोक आपल्या घरी जाण्यास निघाले. त्या रात्री जेव्हा त्यांनी शेकोटी केली...
योसेफ, येशू कुठे आहे ?
तो त्याच्या मित्रांसोबत असेल मी त्याला शोधतो.


परंतु कोणीहि येशूला बघितले नव्हते. योसेफ व मरीया परत यरुशलेमेस आले. त्यांनी प्रत्येक ठिकाणी येशूचा शोध घेतला. गर्दीतील रस्त्यावर. व शेवटी मंदिरात.
येशू ! आम्ही तुला पुष्कळ वेळेपासून सगळीकडे शोधत आहोत.
परंतु, आई तुला माहीत नाही कां की मी माझ्या पित्याच्या घरात असावे ?


तुमच्या मुलाच्या शास्त्राच्या ज्ञानामुळे आम्हाला आश्चर्य वाटले त्याच्या प्रश्नांवरुन असे कळले की त्याने देवाविषयी व मानवाकरिता जे नियम देवाने लावून दिले त्यावर त्याने मनापासून विचार केलेला आहे.
येशू इतरांसारखा नाही. मी त्याची आई असून सुद्धा त्याच्याविषयी पूर्ण समजू शकले नाही.


येशू योसेफ व मरीयेसोबत नासरेथास परत जातो, तीस वर्षांचा होईपर्यंत तो त्याठिकाणी राहतो. तो शरीराने निरोगीरीत्या वाढतो व नासरेथ येथील लोकांच्या मर्जीत बसतो. देव सुद्धा त्याच्यावर संतुष्ट होता.
मृतसागरापासून सत्तर मैलावर अरण्यात त्याच्या वयाचाच एक मनुष्य त्याच्या जन्माअगोदर योजिल्याप्रमाणे तयारी करतो.

# परीक्षा !

लूक ३:१-४:४


येशूचा चुलत भाऊ योहान जसा समजदार झाला. त्याच्या पित्याने त्याला म्हटलें "तुझ्या जन्मा अगोदर देवाने तुझ्यासाठी अशी योजना केली आहे की तू विशेषरीतीने त्याची सेवा करावी." देवाची सेवा करण्याकरिता योहान मोठा होत गेला व त्याच्या आईवडिलांच्या मृत्यूनंतर तो अरण्यात प्रार्थना व अभ्यास करण्याकरिता गेला त्याठिकाणी देवाने त्याला त्याची सेवा सुरु करण्यास सांगितले.
हे प्रभू, तारणाऱ्याच्या आगमणाकरिता मार्ग तयार करण्यास मी तयार आहे.


योहान त्याचे शब्द कृतीत आणतो व यार्देन नदीजवळ उपदेश करण्यास सुरुवात करतो.
तुमच्या पापाबद्दल पश्चात्ताप करा आणि बाप्तिस्मा घ्या कारण देवाचे राज्य जवळ आले आहे.


जुन्या संदेष्ट्याप्रमाण बोलणाऱ्या व दिसणाऱ्या मनुष्याविषयी वर्तमान सर्वत्र पसरले. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे ऐकण्यासाठी लोक यरूशलेमेतून बाहेर आले. काही जण फक्त जिज्ञासू होते परंतु योहानाला त्यांचे विचार माहीत होते.
तुम्हाला काय वाटते की तुम्ही यहूदी असल्यामुळेच तुमचा प्रवेश देवाच्या राज्यात होईल ? नाही, तुम्ही पश्चात्ताप करायला हवा.


चेष्टा करणारे परत निघून गेले परंतु पुष्कळांनी लक्षपूर्वक ऐकले. एके दिवशी लोकसमुदाय यार्देन नदीजवळ एकत्रित झाले.
देवाने अभिवचन दिलेला तारणारा तूं आहेस काय ?
नाही, मी पाण्याने बाप्तिस्मा करतो, परंतु तो देवाच्या पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा करेल. स्वतःला तयार करा तारणारा येत आहे !


योहानाला माहीत नसतांना तो ज्याच्याविषयी बोलत आहे तो लोकसमुदायात उभा आहे येशू नासरेथाहून त्याला ऐकण्याकरिता आला जो बाप्तिस्मा करण्यासाठी सांगतो.
बाप्तिस्मा करण्यासाठी तूं माझ्याकडे का आला ? मी तुझ्याकडून बाप्तिस्मा घ्यायला हवा.
योहान, आम्ही दोघेही देवाच्या राज्याचे आहोत हे दाखविणे चांगले आहे.


मग योहान येशूचा बाप्तिस्मा करतो व जेव्हा येशू पाण्याबाहेर येतो देवाचा आत्मा कबुतराप्रमाणे त्याच्यावर उतरतो. मग स्वर्गातून अशी वाणी होते.
हा माझा प्रिय पुत्र आहे ज्यावर मी संतुष्ट आहे.
काय झाले आहे हे लोकसमुदायाला कळत नाही. त्यांनी तारणाऱ्याला बघितले हे न समजताच घरी जातात. योहान उपदेश देतच राहतो. तुमच्या पापाबद्दल पश्चात्ताप करा. कारण देवाचे राज्य जवळ आले आहे.
येशूकरिता त्याच्या पित्याचे शब्द मंजुरीच्या चिन्हाप्रमाणे आहेत व पवित्र आत्म्याचे दान हे देवाने त्याला पाठवून जे काम दिले त्यामध्ये साहाय्य करण्याची खात्री आहे. तो अरण्यात एकटा जातो जेणेकरुन तो देवाचे राज्य वाढविण्याच्या स्थापन करण्याच्या योजनेवर विचार करेल.
चाळीस दिवस झाल्यानंतर येशूला भूक लागली जेव्हा तो अन्नाविषयी विचार करतो तेव्हा त्याला सैतानाची वाणी कानावर ऐकू येते जी त्याला अशा मोहात पाडते की तो त्याच्या दैवीशक्तिचा उपयोग स्वतःच्या बऱ्यासाठी करेल. "जर तूं खरच देवाचा पुत्र आहे. तर ह्या धोंड्यास भाकरी होण्यास सांग. देवाला असे वाटत नाही की त्याच्या पुत्राने उपाशी राहावे" सैतानाने म्हटले.
शास्त्र असे सांगते, मनुष्य केवळ भाकरीनेच जगणार नाही तर देवाच्या शब्दाने जगेल.
सैतान तेवढ्यात शांत राहिला नाही आणि काही वेळात त्याने अधिक शक्तिने मोहात पाडून येशूची परीक्षा घेण्याचा प्रयत्न केला.


अरण्यात विजय
देवाचे कार्य करण्यापासून येशूला थांबविण्यासाठी सैतान येशूची शक्ती स्वतःकरिता वापरण्यासाठी जगातील शक्तीच्या मोहात पाडतो. परंतु येशू नाकारतो. सैतान परत प्रयत्न करतो ह्यावेळेस सैतान काही अद्भूत करुन प्रसिद्ध होण्याच्या मोहात येशूला पाडतो.
"मंदिराच्या वरुन खाली उडी घेऊन स्वतःच्या दैवीशक्ती लोकांपुढे प्रदर्शित कर" सैतानाने म्हटले. "कारण जर तूं देवाचा पुत्र आहेस तर, त्याचे स्वर्गदूत तुझी काळजी घेतील."
शास्त्र सांगते "तूं आपल्या देवाची परीक्षा घेऊ नको"
प्रत्येक मोहाला नाकारुन येशू अरण्य सोडून यार्देनेच्या पलीकडे बेथानी या ठिकाणी परत जातो.


येशू बेथानीत प्रवेश करतो, बाप्तिस्मा करणारा योहान त्याचे दोन शिष्य अंद्रिया व योहान यास येशूकडे बोट करून दाखवितो.
तो पाहा तारणारा ज्याच्या विषयी मी तुम्हाला सांगत होतो.
ते दोघेही लगेच वळून येशूच्या मागे जातात.
गुरुजी,... आम्ही आपल्यासोबत बोलावे कां ?
हो, माझ्यासोबत माझ्या राहण्याच्या ठिकाणी या.
येशूचे ऐकणे हा एक अद्भूत अनुभव आहे. काही तास लोटल्यानंतर अंद्रियाला अचानक आठवते.
माझा भाऊ ! तो कफर्णहूमावरुन माझ्या सोबत बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या सोबत आला. मी त्याला शोधून तुमची भेट घेण्यासाठी आणतो.
ज्याठिकाणी त्यांचा भाऊ व तो राहत होते तिकडे अंद्रिया धावू लागतो.


थानीच्या रस्त्यावरुन शिमोन आतुरतेने अंद्रियाच्या मागे जातो.
हा माझा भाऊ. शिमोन आहे,
होय, तू शिमोन आहे, परंतु इथून पुढे तुला पेत्र म्हणतील कारण तूं खडकाप्रमाणे होशील.
दुसऱ्या दिवशी येशू उत्तरेस गालील याठिकाणी जातो. तो आणखी एक दुसरा तरुण फिलीप्प यास आपला शिष्य होण्याकरिता बोलावितो


फिलीप्प येशूचे आमंत्रण स्वीकारतो. अंद्रियाप्रमाणे त्याला शुभवर्तमान सांगण्याची इच्छा होते. म्हणून तो मित्राला सांगण्याची घाई करितो.
नाथनियेल....माझ्यासोबत चल ! मला तारणारा भेटला आहे. तो नासरेथचा येशू आहे.
नासरेथ ? त्या गावातून काही चांगले निघेल ?


तू जे सांगतो ते खरे आहे तर मनुष्य त्याला अनुसरण्याकरिता त्याच्याजवळ जे आहे ते सोडून टाकेल.
तूं चल स्वतः येऊन बघ !


नथानिएल येशूला बघतो पण तो तरीही विश्वास ठेवत नाही. मग येशू बोलतो.

# पाण्याचे सहा रांजण

योहान १:४७-५१, २:१-११, २३-२५, ३:१-२




जेव्हा ते गावांत पोहचतात तेव्हा येशूचा मित्र त्यांना नमस्कार करतो.
कृपया माझ्या घरी लग्नाच्या मेजवानीकरिता या... तुझी आई सुद्धा येत आहे.
धन्यवाद... तुझ्या आनंदात सहभागी होण्याकरिता मला आवडेल.
मेजवाणीच्या वेळी नवरदेवास चिंता वाटेल अशी गोष्ट मरीयेच्या लक्षातै येते. द्राक्षरस संपलेला असतो. ती येशूला सांगते, व चाकरांकडे जाते.
तो जे काही सांगेल ते करा.
हे सर्व रांजण पाण्याने भरा.
पाण्याने कां ? आम्हाला द्राक्षरस हवा आहे.
परंतु चाकरांना येशूच्या निराळ्या अधिकारमय वाणीची जाणीव होते व ते त्याचे ऐकतात.
थोडेसे मुख्य वाढणाऱ्याकडे न्या.
कां... हा द्राक्षरस आहे ! हा चमत्कार आहे !
हा मनुष्य देवाचा संदेष्टा असावा..... सर्वसाधारण मनुष्य असे करुं शकत नाही.




त्या घाईगर्दीच्या रस्त्यावर येशू चालत असतांना येशू लंगड्यांना व आजाऱ्यांना बरे करतो.









2

## अधिकाऱ्याचा प्रश्न

योहान ३:३-४: ६

निकदेमाची खात्री नव्हती तो प्रश्नात होता: "देवाच्या राज्यात प्रवेश करण्याकरिता मनुष्याने काय करावे ?" रात्री त्याला गुपितपणे जावे लागले.... येशू राहत होता त्याठिकाणी तो जातो व त्याने विचारण्या अगोदरच येशू त्याच्या प्रश्नांचे उत्तर देतो....

निकदेम यहूद्याच्या न्यायसभेचा अधिकारी, याला न सुटणारा असा प्रश्न होता. यरुशलेमेमधील लोक विचारीत होते की "येशू हा तारणारा आहे का जो पॅलेस्टाइनमध्ये रोमी साम्राज्य घालवून देवाचे राज्य स्थापन करेल ?





तूं एकदा पृथ्वीवरील आईवडिलांद्वारे जन्मला परंतु स्वर्गाच्या राज्यात राहण्याकरिता तुला देवाच्या आत्म्याद्वारे जन्म घेणे आवश्यक आहे.
मला समजले नाही.
तूं वारा वाहतांना पाहू शकत नाही. परंतु वारा जे करतो ते बघू शकतो तूं देवाच्या आत्म्याला बघू शकत नाही परंतु जर मनुष्य नव्याने जन्मला तर त्याच्या वागण्यावरुन तूं सांगू शकतो की त्याच्या अंतःकरणात देवाचा आत्मा आहे. देवाने जगावर प्रीति केली व जे कोणी माझ्यावर विश्वास ठेवतात. त्यांना नवीन जीवन देण्याकरिता मला पाठविले आहे.
निकदेम गोंधळलेल्या अवस्थेत परत जातो परंतु येशूविषयी व त्याच्या शिक्षणाविषयी अधिक शिकण्याची त्याची इच्छा असते.
यरुशलेमेतील पुष्कळ लोक त्याला तारणारा म्हणून स्वीकारण्यास तयार नसतात हे येशू बघतो व तो शहर सोडून जातो. यहूदामध्ये तो देवाच्या राज्याविषयी लोकांना सांगतो व राज्यात प्रवेश करण्याकरिता काय करावे हे देखील सांगतो. ह्याठिकाणी लोक उत्कंठतेने ऐकत आहेत.
हा गुरु सर्व संदेष्ट्याहून मोठा आहे.
यहूदा येथील येशूच्या यशस्वी सेवेची खबर बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाबद्दल पोहंचते.
मी असे ऐकले की, येशू दिवसेंदिवस प्रसिद्ध होत आहे.
देवाला धन्यवाद असो. त्याचा मार्ग तयार करण्याचे कार्य मी पूर्ण केले. त्याची वृद्धी व्हावी व माझा ऱ्हास व्हावा.


काही दिवसांनी येशूला त्याच्या मित्राचीं बातमी मिळते.
हेरोदाने बाप्तिस्मा करणाऱ्या योहानास क्रांती सुरु करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल तुरुंगात टाकले.
क्रांती ? नाही..... खरे कारण आहे की योहानाने हेरोदास त्याच्या भावाच्या पत्नीशी लग्न करण्यास निषेध केला.
नंतर लगेच येशू त्याची सेवा इतर प्रांतात वाढविण्याचा विचार करतो. तो शमरोनाच्या उत्तरप्रांतात गालिलास जाण्यास निघतो.
ते जसे शमरोनातील गावाजवळ जातात, येशू त्यांच्या शिष्यांना अन्न आणण्याकरिता पुढे पाठवितो.
शमरोनाच्या मार्गाने गालिलात लवकर पोहचता येईल, परंतु हे योग्य राहील कां कारण यहूदी लोकांचा शमरोनी लोक तिरस्कार करतात.
येशू विहिरीजवळ विश्रांती घेत असता एक स्त्री पाण्याची घाघर घेऊन पाणी भरण्यास येते.
यहूदी ! त्याला माहीत नाही का की यहूदांचे शमरोनात स्वागत केले जात नाही म्हणून ?

## शत्रूंच्या हद्दीत

योहान ४: ६-४४, लूक ४: १६-२८

पाचशे वर्षांपासून यहूदी व शमरोनी हे कट्टर शत्रू होते म्हणून जेव्हा येशू शमरोनी स्त्रीला पाणी मागतो तेव्हा तिला आश्चर्य वाटते.






जेव्हा स्त्री गावात गेलेली असते तेव्हा येशूचे शिष्य परत येतात व त्यांनी आणलेले जेवन सोबत करण्यास येशूला विनंती करतात.








शब्बाथाच्या दिवशी त्याच्या नासरेथगावी तो सभास्थानात जातो. त्याठिकाणी तो यशयाच्या पुस्तकातून मसीहा जो येणार आहे तो शास्त्रभाग वाचतो. मग तो खाली बसून शिकवायला सुरुवात करतो.
हा शास्त्रलेख तुम्ही ऐकत असता पूर्ण झाला.
तूं... मसीहा ? कां ? तूं नासरेथाच्या सुताराचा मुलगाच आहेस !
कोणत्याही संदेष्ट्याला त्याच्या स्वतःच्या प्रांतात स्वीकारल्या जात नाही. एलिशाच्या दिवसाविषयी आठवा इस्त्राएलात पुष्कळ कुष्ठरोगी होते परंतु संदेष्ट्याने एकालाच रोगमुक्त केले... तो परराष्ट्रीय नामान होता.
देव परराष्ट्रीयांकरिता त्याच्या निवडलेल्यांपेक्षा जास्त चांगले करेल ह्या विचाराने भक्ति करणाऱ्या जमावाला क्रोधीत जमावात बदलून टाकेल.
याला शहराबाहेर काढा !
याला मारुन टाका !


मग..अचानक... येशू त्याच स्त्री–पुरुषांच्या चेहऱ्याकडे बघतो जे त्याला तीस वर्षापासून ओळखित होते. मग तो हळूवार त्यांच्यामागे चालून निघून जातो, कोणीहि त्याला हात लावण्याचे धैर्य करीत नाही.


नासरेथातून येशू कफर्णहूमास जातो. गालील समुद्राच्या यार्देन नदी जवळ त्याला दोन भाऊ भेटतात.
पेत्र ! अंद्रिया ! माझ्यामागे या मी तुम्हाला माणसे धरणारा करीन.


ते त्यांचे जाळे सोडून लगेच येशू सोबत जातात. परत किनाऱ्याजवळ आणखी दोन भावांना येशू बघतो.... याकोब व योहान
माझ्या सोबत चला आणि माझे शिष्य व्हा.

# छपरावरुन

मार्क २: १-१२









परुशी काय विचार करीत आहे हे येशूने ओळखले.







माझ्या पापांची क्षमा झाली आहे ! मी बरा झालो आहे, देवाची स्तुति असो !


अशाप्रकारचे मी कधीहि बघितले नाही.
मी सुद्धा नाही परंतु जर तो मसीहा आहे असे आपल्याला दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे, तर तो असे काहीतरी का करीत नाही की रोमी लोकांस बाहेर घालून देईल ?


ज्याठिकाणी तो शिक्षण देत होता ते घर तो सोडून जातो व तेव्हा तो शहराच्या प्रवेशद्वारा जवळील मोठ्या घराजवळून जातो...
तुम्ही जकातदार सर्व चोर आहात. मी तेवढा जकात देऊ शकत नाही आणि हे तुला माहीत आहे.
तूं मुकाट्याने तो भर ! लक्षात ठेव सर्व रोमी सरकार माझ्या पाठीशी असण्याचा अधिकार मजकडे आहे.

# एका मनुष्याचे उत्तर

मत्तय ९: ९-१३, १२: ९-१४

कफर्णहूमात यहुद्यामध्ये मत्तयापेक्षा कोणीहि दुसरा तुच्छ लेखला गेला नव्हता, तो रोमी सरकाराचा जकातदार होता. एके दिवशी जेव्हा तो व व्यापारी मालाच्या जकाताविषयी वादविवाद करीत होते तेव्हा येशू त्या वाटेने जात होता. येशूने सरळ ह्या लोकांनी तिरस्कार केलेल्या जकातदाराच्या डोळ्यांने बघितले...



लोकांच्या गर्दीत आश्चर्य होईल असे घडले. मत्तय आपले काम तिथेच सोडून येशूच्या मागे गेला.




येशूसोबत आपल्या नवीन जीवनाची सुरुवात करण्यात मत्तयाला आनंद झाला. त्याने मोठी मेजवानी दिली व आपल्या मित्राला येशूची भेट घेण्याकरिता आमंत्रित केले. काही परुशी जे त्या वाटेने जात होते त्यांना हे बघून आश्चर्य वाटले.




येशूने त्यांच्या शिष्यांकरिता उत्तर दिले




परुश्यांजवळ याचे उत्तर नव्हते. परंतु ह्यामुळे त्यांना अधिक राग आला म्हणून ते येशू जिथे-जिथे जात होता त्या प्रत्येक ठिकाणी त्याची टिका करण्यासाठी काही सापडेल याची वाट बघत होते. एका शब्बाथ दिवशी सभास्थानात...




शब्बाथ दिवशी बरे करणे हे नियमाप्रमाणे आहे कां ?
जर तुमच्याकडें मेंढरु आहे व ते जर शब्बाथ दिवशी खड्ड्यात पडले तर तुम्ही त्याला बाहेर काढणार नाही कां ? मेंढरांपेक्षा मनुष्य जास्त महत्वाचा नाही कां ? तुमच्या प्रश्नाचे उत्तर हे आहे.... होय, शब्बाथ दिवशी चांगले काम करणे नियमाप्रमाणेच आहे.


मग सर्व परुश्यांपुढे येशू त्या मनुष्यास हात पुढे करण्यास सांगतो आणि जसा तो हात पुढे करतो....
माझा हात...तो परत प्रबल झाला आहे ! देवाने माझ्या प्रार्थनेचे उत्तर दिले !


त्यांचा पराजय झाल्यामुळे त्यांना राग आला व हे परुशी सभास्थान सोडून निघुन गेले.
त्या मनुष्यास नष्ट करायला हवे आणि जेवढ्या लवकर होईल तेवढे चांगले.
तूं बरोबर बोलतोस...परंतु त्याच्या विरुद्ध आमच्या जवळ मोठ्या गुणांचा पुरावा असायला हवा. नाहीतर हा लोकांचा जमाव आपल्या विरुद्ध उठेल.

# डोंगरावरील प्रवचन

लूक ६: १२-१६, मत्तय ५: ६-७, ८: ५-१३, १३: ४५-४६, मार्क ४: ३५-३७




सकाळी तो आपल्या शिष्यांना त्याच्याजवळ बोलावितो आणि समुहातून तो बारा जणांना त्याचे मतदनीस होण्याकरिता नावाने बोलावितो : पेत्र म्हटलेला शिमोन व त्याचा भाऊ अंद्रिया, जब्दीचा मुलगा याकोब व त्याचा भाऊ योहान, फिलिप्प व बर्थलमय, थोमा, व मत्तय जकातदार अल्फीचा मुलगा याकोब व तद्दय, शिमोन कनानी, यहूदा इस्कर्योत यांना बारा प्रेषित म्हणून ओळखण्यात आले.



ते जेव्हा डोंगरावरुन खाली आले तेव्हा त्यांना मोठा लोकसमुदाय येशूची वाट पाहतांना दिसला तेव्हा येशू डोंगरावर बसून प्रवचन देऊं लागला की जे देवाचे राज्य कशा प्रकारचे आहे हे स्पष्ट करते.

जे दया करतात ते धन्य, कारण त्यांच्यावर दया करण्यात येईल.
जे अंतःकरणाचे शुद्ध ते धन्य, कारण ते देवाला पाहतील.
जे शांति करणारे ते धन्य, कारण त्यांना देवाची मुले म्हणतील...
तुम्ही जगाचा प्रकाश आहा....तुमचा प्रकाश इतरांपुढे असा पडू द्या की ते तुमचे चांगले कृत्ये पाहून तुमच्या स्वर्गातील पित्याचे गौरव करतील......
शत्रुंवर प्रेम करा जे तुम्हांला श्राप देतात त्यांना आर्शीवाद द्या. जे तुमचा द्वेष करतात त्यांना बरे करा. जे तिरस्काराने तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.
जेणेकरुन तुम्ही तुमच्या स्वर्गातील पित्याचे लेकरे व्हाल. कारण तो आपला सूर्यप्रकाश वाईटांवर व त्याचप्रमाणे चांगल्यांवर देखील पाडतो व नीतिमानावर व अनीतिमानांसाठी देखील पाऊस पाडतो.
म्हणून जसे लोकांनी तुमच्याशी वागावे अशी तुमची इच्छा आहे, तसे तुम्ही त्यांच्याशी वागा. कारण हे नियमाप्रमाणे व संदेष्ट्यांप्रमाणे आहे.

(हा उतारा मत्तय 5,6,7, मधून घेतला आहे.)




प्रवचनानंतर येशू त्यांच्या शिष्यांना परत कफर्णहूमास नेतो. ते जसे शहराच्या द्वाराजवळ येतात रोमी सेनाधिपती त्यांना थांबवितो.
येशू ! माझा चाकर आजारी आहे. तर कृपया त्याला बरे कराल कां ?
मी तुझ्या सोबत येतो.
माझ्या घरी तूं यावे अशी माझी लायकी नाही. परंतु मला माहीत आहे की तूं जर शब्द बोललास तर माझा चाकर बरा होईल.
संपूर्ण इस्त्राएलात मी एवढा विश्वास असलेला मनुष्य बघितला नाही. तुझ्या चाकराकडे परत जा आणि जसा तो विश्वास धरितो तसे होईल.
सेनाधिपती घाईने घरी जातो.
धनी ! बघा ! मी बरा झालो हे अचानक झाले.. अगदी काही मिनिटापूर्वी
तुम्हाला आश्चर्य वाटले नाही कां ?
नाही.. कारण येशू तुला बरे करील असा माझा विश्वास होता.


जरी आता सुद्धा परुशी त्यांच्याविरुध्द योजना करीत होते येशू कफर्णहूमात शिक्षण देत राहिला. एके दिवशी त्याचे ऐकण्याकरिता आलेला लोकसमुदाय इतका जास्त होता की त्याला नावेमध्ये बसून संदेश द्यावा लागला.
आणखी स्वर्गाचे राज्य चांगल्या मोत्यांचा शोध करणाऱ्या कोणा एका व्यापारासारखे आहे; त्याला एक अति मूल्यवान मोती आढळते; मग त्याने जाऊन आपले सर्वस्व विकले आणि ते विकत घेतले. स्वर्गाचे राज्य त्या मोत्यासारखे आहे. तुम्ही त्यांच्यासाठी सर्व काही देऊ शकाल इतके त्याचे मोल आहे.
संध्याकाळ झाल्यावर येशू त्याच्या शिष्यांना त्या तलावाच्या पलीकडे जाण्यास सांगतो.
अचानक वादळ येईल अशी ही रात्र वाटत आहे.

# सागरात वेडा मनुष्य

मार्क ४: ३७-४१, ५: १-२४, ३५-४३







घाबरलेल्या अवस्थेत शिष्य होडीच्या तळास घाईने जातात
गुरुजी, आपण बुडत आहो तुम्हाला काळजी वाटत नाही कां ?
येशू उठून सागरातील वादळाकडे बघतो
, शांत राहा !
लगेच, वारा थांबतो आणि लाटा शांत होतात.
हा आहे तरी कोण, वारा आणि समुद्र देखील ह्यांचे ऐकतात ?
सकाळी नाव किनाऱ्याला पोहंचते आणि तसे येशू आणि शिष्य समुद्राच्या किनाऱ्याजवळून जात असतात. एक भुतग्रस्त व्यक्ती येशूला भेटण्यासाठी धावत येतो.
सांभाळून राहा.. त्याने त्याचे साखळदंड तोडले आहे.



दुष्ट आत्म्या या मनुष्यातून बाहेर निघ.
तो मनुष्य बरा झाला – ज्या लोकांनी हे बघितले त्यांना आश्चर्य वाटले आणि ते विचार करु लागले की येशूला किती सामर्थ्य आहे की दुष्ट आत्मे देखील याचे ऐकतात.
मला आपणासोबत येऊ द्या.
तूं जर आपल्या घरी जाऊन आपल्या मित्रांना देवाने तुझ्यासाठी काय केले हे सांगशिल तर अधिक बरे होईल.
नंतर काही वेळातच येशू व त्याचे शिष्य कफर्णहूमात परत जातात. परंतु जसा येशू शिकविण्यास सुरुवात करतो जसाचयाईर जो सभास्थानाचा मुख्य आहे गर्दीतून येऊन येशूच्या पाया पडतो.
माझी लहान मुलगी मरत आहे. कृपा करुन चला.
येशू याईरासोबत जातो. परंतु रस्त्यातच त्यांना याईराच्या घरुन येणारा चाकर दिसतो...
फार उशीर झाला आहे... तुमची मुलगी मरण पावली आहे!



आंकांत करणारा लोकसमुदाय
मार्क ५:३८-४३ , मत्तय ९ : ३५ ११: १ १४:१-१२
योहान ६:१-१०
जेव्हा येशू व त्याचे शिष्य याईराच्या घरी पोंहचले तेव्हा त्यांना रडणारा लोकसमुदाय दिसला कारण याईराची कन्या मरण पावली होती.
तुम्ही का रडत आहात ? ही लहान मुलगी झोपली आहे.
झोपली आहे ? ह्या कुटुंबासाठी तूं खोटी आशा उत्पन्न करण्याचे धैर्य का करतो? मुलगी मेली आहे आणि सर्वांना हे माहीत आहे.


येशु हळूवारपणे मुलीच्या आईवडिलांना मुलीच्या खोलीत नेतो. त्या ठिकाणी तो मुलीचा हात धरून "ऊठ" असे म्हणतो. लगेच ती उठून येशूकडे आश्चर्याने बघते.
तिला खावयास काही तरी द्या... परंतु या खोलीत काय झाले हे कोणालाच सांगू नका.
परंतु याईर हा प्रतिष्ठित मनुष्य होता. त्याच्या मुलीची ही वार्ता लगेच सर्वत्र पसरली व जसा येशू गालीलातून उपदेश करीत व रोग बरे करीत आपला प्रवास करीत होता. त्याची प्रसिद्धी वाढली. परूशी रागाने हे बघत होते. आतापर्यंत त्यांना त्याच्याविरुद्ध काहीच खरा गुन्हा सापडला नव्हता आणि एकही गुन्हा न सापडल्यामुळे परूशी उत्साहीत लोकसमुदायास त्यांच्या विरुद्ध भडकविण्याचे धैर्य करू शकले नाही.
परंतु ज्या लोंकानी संदेश ऐकला नव्हता त्यांची येशूला काळजी होती. त्याने त्याच्या शिष्यांना एका बाजूला बोलाविले.
लोक मेंढपाळ नसलेल्या मेंढराप्रमाणे आहेत. माझी इच्छा अशी आहे की तुम्ही दोघे-दोघे जोडीने जावून ज्याद्वारे मी केले त्याप्रकारे उपदेश करावा व आजाऱ्यांना बरे करावे. काय बोलावे याची चिंता करू नका कारण देवाचा आत्मा तुमच्याद्वारे बोलेल.
संबंध गालीलातून येशूचे शिष्य उपदेश करीत होते. ते परत आल्यावर येशू त्यांना शांत ठिकाणी नेऊन विश्रांती घेण्याचा व भविष्यांच्या योजनांविषयी बोलण्याचा विचार करतो. ते जात असता बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा शिष्य दु:खद बातमी आणतो.
हेरोद राजाने योहानाचा शिरच्छेद केला.
हेरोद दुष्ट मनुष्य आहे परंतु त्याच्या पापांपैकी हे पाप त्याचे अतिशय घोर आहे.


योहानापेक्षा मोठा संदेष्टा जगला नाही त्याने त्याचे आयुष्य देवाची सेवा करण्यात घालविले.
ह्या दुःखाच्या परिस्थीतीत येशू व त्याचे शिष्य खाडी पार करून डोंगरावर जातात जेणेकरून ते एकटे राहतील परंतु मोठा लोकसमुदाय त्यांच्या मागे जातो. येशू उपदेश देण्याकरिता व आजाऱ्यांना बरे करण्याकरिता दुपारी उशीरा पर्यंत थांबतो.
फिलीप्प ..... ह्या लोकांसाठी आपण अन्न कोठून विकत आणावे?
ह्यां सर्व लोकांसाठी? स्त्रिया व लेकरांना वगळता ह्याठिकाणी पाच हजार पुरूष आहेत.
ह्यां मुलाजवळ पाच भाकरी व दोन मासे आहेत... परंतु ऐवढ्यामोठ्या लोकसमुदायासाठी ह्याचा काहीच उपयोग नाही.
लोकांना बसवा आणि अन्न माझ्याकडे द्या.

# पृथ्वीवरील सिंहासन नाही

योहान ६:१०-१५;मत्तय १४:२३-३०

फार दुपार झाली आहे जो लोकसमुदास येशूच्या मागे आला होता. त्याला भुक लागली होती. परंतु या मुलाजवळच फक्त अन्न उपलब्ध होते तो आतुरतेने ते येशूजवळ देतो. येशू त्यासाठी देवाचे आभार मानतो व ते त्याच्या शिष्यांजवळ देतो.




परंतु शिष्यांना येशूवर विश्वास होता..... आणि त्यांनी त्याची आज्ञा पाळली.









**प**रंतु देवाने येशूला तारणारा म्हणून पाठविले होते. मंनुष्य जातीला देवाच्या राज्यात आणण्या करिता...सैन्याला हुकूम देण्याकरिता नव्हे व राजासन जिंकण्याकरिता नव्हे. जेव्हा येशूने बघितले की लोक त्याला राजा बनविण्याकरिता इच्छुक आहेत तेव्हा त्याने त्याच्यां शिष्यांना लागलेच बोलाविले .







थोडयाच वेळात वादळ येते...
किनारा आणखी किती लांब आहे.?
आम्ही आता फक्त अर्ध्यापर्यंत आलो आहे
लगेच ह्यांना पाण्यावरून चालंताना आकृती दिसते. "भूत" ते घाबरून ओरडतात लांटामधून एक शांत वाणी ऐकू येते "ती आहे भिऊ नका."
ये !
प्रभु ! जर तूं आहेस तर तुझ्याकडे येण्यास मला सांग
पेत्र लगेच नावेतून उडी मारून पाण्यावरून चालत येशूकडे जाऊ लागतो परंतु तो जेव्हा वादळाची शक्ती पाहतो तोच त्याचा विश्वास गमावून बुडू लागतो...

# समुद्रावर चमत्कार

मत्तय १४:३०-३६, योहान ६:२२-७१,
मार्क ७:१-२३,मत्तय १६:१३-२६, १७:१-२

रात्रीचा सोसाट वारा, रागात असलेल्या लाटांसोबत गालील समुद्रावरून वाहात होता. येशूचे शिष्य ह्या वादळातून कठीण रीतीने नाव वल्हवत होते...जेव्हा ते एक आकृती पाण्यावरून चालतांना व त्यांच्याकडे येतांना बघतात तेव्हा त्यांना भीति वाटते. ...नंतर ते बघतात की पाण्यावर चालणारा येशूच आहे. पेत्र नावेतून उतरून येशूकडे चालू लागतो. परतु जेव्हा तो खवळलेल्या लाटा बघतो तेव्हा त्याचा विश्वास डळमळतो.




येशू पेत्राला वाचवितो व जेव्हा ते नावेत जातात तेव्हा वारा आणि समुद्र शांत होतो
जे येशूने केले ते देवाकडून आलेलाच करू शकतो.
दिवस मावळल्यावर शिष्य नाव तीरावर आणतात जेव्हा लोक येशूला बघतात ते आजारी लोकांना येशूकडे आणण्याची घाई करतात. शांत रीतीने व प्रेमाने तो सर्वांना बरे करतो.
जर मी त्याच्या वस्त्रांना शिवु शकले तर मला माहीत आहे की मी बरी होइल.
नंतर त्यादिवशी येशू कफर्णहूमातील सभास्थानात जातो. ज्या लोकसमुदायाने एक दिवस आधी येशूने दिलेले भोजन केले होते तो परत भोजन करण्याची विनंती करत होता. जेव्हा येशूने त्यांना आत्मिक गरजेविषयी संदेश दिला तेव्हा त्यांच्यापैकी पुष्कळ निराश होऊन निघून गेले.
हे बघून परूशी लोक उघड येशूची टिका करतात.
तुझ्या शिष्यांना हात न धुता जेवतांना आम्ही बाधितले तूं त्यांना आमचे नियम मोडून स्वतःला विटाळविण्याची मुभा कशी देतो ?
जे काही मनुष्य तोंडाने आत टाकतो जे त्याला विटाळवीत नाही तर तोंडाबाहेर वाईट शब्द त्याला विटाळवितात.


त्याच्या शिष्यांनी त्याने बाजु घेतल्यामुळे त्यांना धक्का बसतो व ते परूशी निघून जातात व येशूला नष्ट करण्याचा पक्का निश्चय करतात
तुला असे वाटत नाही का की तू परूश्यांना रागाविलेस ?
परूशी देवाच्या इच्छेला आंधळे आहेत आणि ते लोकांना आंधळे होण्याचे मार्गदर्शन करतात.
पुष्कळसे लोक येशूला जगीक राजा म्हणून स्वीकारतील म्हणून येशू गालील सोडून जातो. तो त्याच्या शिष्यांना कैसर फिलीप्पाच्या प्रांतात नेतो. त्याठिकाणी तो त्यांना गुप्त स्थळी शिक्षण देतो एके दिवशी तो त्यांना विचारी की लोक मला काय म्हणून म्हणतात ?
बाप्तिस्मा करणारा योहान ..... एलीया...
परंतु तुम्ही मला कोण म्हणून म्हणता.
तूं ख्रिस्त आहेस, जिवंत देवाचा पुत्र.
पेत्रा तूं धन्य आहेस. माझ्या स्वर्गातील पित्याने तुला हे प्रगट केले.
आता शिष्यांना खरोखर कळते की येशू हा अभिवचनात सांगितलेला मसीहा आहे. जेव्हा तो यरुशलेमेत जाईल तेव्हा काय होईल हे तो त्यांना सांगतो.
परूशी आणि शास्त्री मी मसीहा आहे. असा विश्वास धरीत नाही. ते मला मारून टाकतील परंतु मी तिसऱ्या दिवशी परत जिवंत होईल.


मारून टाकतील ? कधीच नाही.
पेत्रा, माझ्यासाठी देवाची योजना काय आहे, ही तुला माहीत नाही. तुम्हा सर्वांना मला सांगू द्या....जर तुम्हाला माझ्यासोबत यायचे आहे तर मला जसे कठीण परिस्थितीतून जायचे आहे तसेच तुम्ही देखील जाण्यास तयार राहा.
जरी येशूने त्यांना सांगितले तरी शिष्य हा विश्वास धरीत नाही की त्याला जीवे मारून टाकतील तें असा विचार करतात की त्याने पुष्कळांची मदत केली म्हणून तो स्वत:चे देखील साह्य करेल. पुष्कळ दिवस लोटल्यावर येशू पेत्र, याकोब व योहानाशी बोलतो की ......
माझ्यासोबत डोंगरावर चला.
मला आश्चर्य वाटते का ....
पुष्कळ वेळेपर्यंत डोंगर चढल्यावर येशू एका बाजुला प्रार्थना करण्यास जातो. त्याचे शिष्य आराम करण्यास खाली थांबतात, पण लगेच सर्व झोपतात आणि उठल्यावर ते काही तरी निराळे, गौरवयुक्त व सुंदर दृश्य बघतात.


एक मुलगा आणि त्याच्या वडिलांचा विश्वास
मत्तय १७:३-१३, मार्क ९:३३, लुक ९ :३७-४५
डोंगरावर येशूसोबत पेत्र याकोब व योहान येशुचे रूपांतर होताना बघतात. त्याचा चेहरा सुर्याच्या लख्ख प्रकाशा प्रमाणे चमकतो त्याचे वस्त्र पांढरे शुभ्र होतात आणि दोन पुर्वीचे महान पुरूष, मोशे व एलीया त्याच्यासोबत संभाषण करतांना दृष्टीस पडतात.


परंतु जेव्हा पेत्र बोलतो त्याचं बरोबर डोंगरावर शुभ्र ढग उतरतात व त्यातून देवाची वाणी ऐकू येते.
हा माझा परमप्रिय पुत्र आहे. ज्यावर मी संतुष्ट आहे. तुम्ही त्याचे ऐका.



शिष्य इतके भ्याले की ते जमिनीवर पालथे पडले परंतु येशूने खाली वाकून त्यांना स्पर्श केला......
भिऊ नका.
दुसऱ्या दिवशी सकाळी डोंगरावरून खाली उतरतांना येशूने त्यांना ताकिद दिली की त्याच्या पुनरूत्थानापर्यंत ही त्याच्या रूपांतराची गोष्ट कोणालाही सांगू नये. ही गोष्ट बघितल्यानंतर येशुच्या शिष्यांना असा विश्वासच होत नव्हता की तो मरेल.... म्हणून येशू त्याच्या मरणातून उठण्याविषयी बोलत असंताना त्यांना प्रश्न पडत असे.
ते खाडीच्या जवळ पोहंचले असता दुसऱ्या शिष्यांभोवती लोक जमले आहेत असे त्यांनी बघितले.
येशू आल्या बरोबर लोकांनी लगेच त्याच्या समोवती गर्दी केली.
माझ्या मुलाला फिटचा त्रास आहे आणि तो बहुतेकदा आगेमध्ये पडतो. मी त्याला तुमच्या शिष्यांकडे आणले परतु त्यांना त्याला बरे करता आले नाही
तुझ्या मुलाला माझ्याकडे आण.
तो बाप येशूने सांगितल्या प्रमाणे करतो परंतु मुलाला फिट आणि तो येशूच्या पायाजवळ जमिनीवर पडतो.
जर तू आमची मदत करू शकतो तर कृपया तसे कर.
ज्याचा विश्वास आहे त्याला सर्व गोष्टी शक्य आहेत.
माझा विश्वास आहे! माझा विश्वास अधिक वाढण्यासाठी माझे सहाय्य कर.
अरे अशुद्ध आत्म्या.. ह्या मुला बाहेर ये.







जेव्हा ते एकटे असतात तेव्हा शिष्य येशुकडे वळून बोलू लागतात.




नंतर कफर्णहूमाच्या रस्त्यावर शिष्य त्या राज्याविषयी बोलत होते जे येशू स्थापन करेल अशी त्यांची अपेक्षा होती. लागलीच ते राज्यात कोण मोठा असेल याविषयी भांडण करुं लागले.



# साताच्या सत्तर वेळा

मत्तय १८:१-१४, २१,२२
योहान ७:११-५२, ८:२१-५९

**क**फर्णहूमाच्या वाटेवर शिष्य त्या राज्यात कोण मोठा असेल याविषयी भांडत होते. ते राज्य जे येशू स्थापन करेल असे त्यांना वाटत होते. ते शहरात आल्यावर येशू त्यांना ते का भांडत होते म्हणून विचारतो. त्यांना सांगण्यास लाज वाटत होती. तो एका लहान मुलाला त्याच्याकडे बोलावितो.




जर कोणाविषयी तुम्हाला काही वाद असेल तर त्याच्या विषयी त्याच्या सोबत लगेच बोला. जर तो ऐकेल तर तुम्ही तुमचा मित्र परत मिळविला आहे.


जर कोणी माझे वाईट केले असेल तर मी किती वेळा त्याची क्षमा करावी ? सात वेळा?
नाही पेत्रा .... साताच्या सत्तरवेळा किंवा देवाने तुझी कितीदा क्षमा करावी. असे तुला वाटते तितके वेळा.


कफर्णहूमावरून येशू पुर्वेकडे यहूद्यात उपदेश करण्यास जातो आणि धार्मिक सणाच्या वेळी यरुशलेमेत पोहंचतो. तो जसजसा शिकवितो लोक आश्चर्य करूं लागतात.
येशू मसिहा आहे कां?
ज्या गोष्टी कोणत्याही मनुष्याने कधीहि केल्या नाही त्याला त्या करतांना मी बघितले.


शास्त्री व परूशी जेव्हा लोक काय म्हणत आहे हे ऐकतात तेव्हा ते लवकरच येशुच्या विरूद्ध लढण्यास तयार होतात.
जर आम्ही त्याच्यावर ताबा घेणार नाही तर लोक त्याला मसीहा म्हणून स्वीकारू लागतील.
मी त्याला थांबवेन मंदीराच्या रक्षकांना बोलवा.
येशुला अटक करा परंतु अशावेळेस करा ज्यावेळेस कमी त्रास होईल.
सणाच्या शेवटच्या दिवशी रक्षक लोक शास्त्री व परूश्याकडे परततात.
येशु कुठे आहे ?
आम्ही ह्या मनुष्याप्रमाणे कोणालाही बोलतांना ऐकले नाही. आम्ही त्याला अटक करू शकत नाही.
शास्त्री व परूशी रागात येतात...परंतु ही बाब वाढविण्यात ते घाबरतात कारण हे शहर सणाकरिता लोकांनी भरलेले असते. परंतु दुसऱ्या दिवशी...
येशू मंदिरात उपदेश करण्यास परततो. तो त्याच्या संदेशात शास्त्री व परूश्यांच्या पापांकडेच बोट दाखवित नाही तर तो असे जाहीर करतो की त्यांचा महान पिता अब्राहाम ह्यांच्यापुर्वी जो देवा सोबत होता तो मीच आहे.
देवाशी असे नाते असल्याचे जाहीर करण्यात त्याला भिती कशी वाटत नाही !
त्याला दगडमार करा! त्याला दगडमार करा !

# यरूशलेमेचा भिकारी देवाच्या पुत्राला भेटतो

योहान ९:१-१०,२१ लूक १०:२५







परंतु मी तो मनुष्य आहे जो आंधळा होतो. येशूने मला दृष्टी दिली.!
शेजारी चिंता करीत होते कारण हा मनुष्य शब्बाथ दिवशी बरा झाला होता. ते लगेच त्याला परूश्याकडे नेतात व ते शब्बाथ दिवशी काय करावे याचे नियम समजवितात.
तूं ज्या येशूविषयी बोलतो तो पापी आहे.....तो शब्बाथाच्या आज्ञेचे पालन करीत नाही.
तो पापी आहे का हे मला ठाऊक नाही परंतु मला हे माहीत आहे की मी आंधळा होतो आणि आता मला दिसते.
परूशी त्या मनुष्याला येशू विरूद्ध होण्यासाठी प्रयत्न करतात. परंतु तों तसे करत नाही म्हणून ते त्याला सभास्थानातून बाहेर काढतात. काय झाले ? येशूला समजते व येशू त्या मनुष्याचा शोध घेतो जसा तो भेटतो तेव्हा त्याच्यासभोवती परूशी लगेच जमा होतात.
तूं देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवला कां ?
तो कोण आहे... की मी त्याच्यावर विश्वास ठेवावा ?
मीच तो आहे ..जो तुझ्याशी बोलत आहे.
प्रभु मी विश्वास धरतो !







एका शहरात येशू उपदेश करतांना एक वकील त्याची परीक्षा घेण्यासाठी संधी शोधतो.



# चार प्रवाशी यरीहोकडे

लूक १०:२५-३९






येशू एक गोष्ट सांगून उत्तर देतो ज्यामुळे त्या वकीलास त्याच्या स्वतःचे उत्तर स्वतः मिळण्यास मदत होते.




अचानक एक शास्त्री त्या वाटेने जातो... तो त्या जखमी मनुष्यास बघतो व लगेच निघून जातो.








जेव्हा त्याने चांगल्या शमरोनाची गोष्ट संपविली, येशूने विचारले की तिघांपैकी कोण त्या लुटलेल्या मनुष्याचा शेजारी झाला ?




**ये**शूने त्याच्या प्रश्नाचे उत्तर कशा कौशल्याने दिले ह्या गोष्टीविषयी तो वकील नवल करीत निघून गेला.




**ये**शूने आपला प्रचार सुरुच ठेवला. बेथानीमध्ये तो आपल्या मित्राला: मरीया, मार्था आणि लाजरस यांना भेट देण्यासाठी थांबला. मरीया घरात जे काही काम करीत होती ते तिने येशूच्या ऐकण्यासाठी थांबविले.



# प्रभूची प्रार्थना

लूक १० : ४०-११ : २; मत्तय ६ : ९-१३; योहान १० : २२-४०;
लूक १५ : १-१९







त्याच्या प्रवासामध्ये येशू प्रार्थनेसाठी थांबत होता. त्याच्या शिष्यांनी येशूच्या जीवनात त्याच्या प्रार्थनेचे सामर्थ्य पाहिले आणि एके दिवशी एक शिष्य त्याच्याशी त्याबद्दल बोलला.
आम्हाला प्रार्थना करायला शिकीव.


येशूने उत्तर दिले, जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा अशी करा.
हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाव पवित्र मानिले जावो. तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरहि तुझ्या इच्छेप्रमाणे होवो. आमची रोजची भाकर आज आम्हांस दे, आणि जसे आम्ही आपल्या ऋण्यांस ऋण सोडिले आहे तशी तूं आमची ऋणे आम्हांस सोड; आणि आम्हास परीक्षेत आणू नको; तर आम्हास वाइटापासून सोडीव कारण की राज्य, सामर्थ्य आणि गौरव ही सर्वकाळ तुझी आहे; आमेन.
क्षणभरासाठी कोणीहि काहीही बोलले नाही नंतर शिष्यांनी त्या प्रार्थनेला जी त्यांच्यासाठी भविष्यांमध्ये उपयोगी येणार होती त्या प्रार्थनेला हळूवारपणे आमेन म्हटले त्यानंतर येशू आणि त्याच्या शिष्यांनी यहूदियाकडे जाण्यासाठी आपला प्रवास सुरु केला. जेव्हा येशू यरुशलेमेस धार्मिक सणासाठी परत आला तेव्हा सर्व शहर त्याच्या कृत्यांविषयी आश्चर्यकर्म करीत होते व बोलत होते.


जेव्हा येशू शलमोनाच्या देवडीवर आला तेव्हा
नी त्याला वेढून घेतले.
तूं आम्हाला किती वेळ वाट पाहण्यास लावणार आहे ? जर तूं मसीहा असशील तर आम्हास सांग.
मी तुम्हाला सांगितले परंतु तुम्ही माझ्यावर विश्वास करणार नाही. देवाच्या नावात जे मी पूर्ण केले तेच मी तुम्हाला कोण आहे हे सिध्द होते.
तुम्ही ऐकले का ? हा देवाला आपला पिता म्हणतो !
त्याला दगडमार करा !
येशू शांतरीतीने गेला तेव्हा त्याला कोणीहि थांबविण्याचा प्रयत्न केला नाही.
येशूने पेरिया जाण्यासाठी यरुशलेम सोडले. जेथे तो प्रचार करणार होता आणि आजाऱ्यांना बरे करणार होता. परत परुशी लोकांनी अशी तक्रार केली की तो पाप्यांसोबत राहतो. येशूने त्यांना गोष्ट सांगितली.
एका माणसाला दोन मुले होती एके दिवशी धाकटा मुलगा बापाकडे आला.
बाबा, मला माझे जीवन माझ्यारीतीने जगण्याची इच्छा आहे. माझ्या मालमत्तेचा वाटा मला द्या.
मला अशी आशा होती की तूं याठिकाणी राहून कामात मदत करशील परंतु जर तुला पैसे हवे असतील तर ते तूं घेऊं शकतो.
तो तरुण दुसऱ्या देशास गेला. तेथे त्याने वाईट संगतीसोबत राहून आपला सर्व पैसा खाण्यात पिण्यात उधळला शेवटी त्याचा सर्व पैसा संपला आणि तो एका कारभाराच्या घरी जाऊन त्याच्या डुकराची काळजी घेऊं लागला.
माझ्या वडिलाच्या नौकरांना यापेक्षा ही कितीतरी जास्त मिळते. मी आपल्या घरी जाईन आणि आपल्या वडिलांना म्हणेल की मी त्यांच्यासाठी काम करीन... मुलगा म्हणून नाही तर एक नौकर म्हणून

# उधळ्यापुत्राचे परत येणे

लूक : १५ : २०-३२; योहान ११ : १-८

जेव्हा परुशी येशूबद्दल तक्रार करीत होते की हा पाप्यांसोबत राहतो तेव्हा येशूने एका तरुणाविषयी ज्याने आपले घर सोडले त्याच्याविषयी गोष्ट सांगितली. तरुण माणसाने मुर्खरीतीने आपला पैसा उधळला जेणेकरुन त्याला शेवटी स्वतःला जिवंत ठेवण्यासाठी एका शेतकऱ्याच्या घरच्या डुकरांची काळजी घ्यावी लागली. त्याच्या दुःखात त्याने घरी जाण्याचे आणि आपल्या वडिलांसाठी काम करण्याचे ठरविले. त्याचा मुलगा म्हणून नाही तर त्याच्याएका नौकराप्रमाणे जेव्हा तो घरी पोहचला तेव्हा त्याचे वडील त्याला भेटण्यासाठी त्याच्याजवळ आले.




घरातले चांगले धष्टपुष्ट वासरु आणून कापा आणि मोठी मेजवाणी करा कारण माझा मुलगा जो हरवला होता तो सापडला आहे.
बाहेर शेतामध्ये वडील मुलगा त्याचे त्यादिवसाचे काम पूर्णकरण्यासाठी कष्ट करीत होता.
जर माझा भाऊ इथे माझ्या मदतीला असता तर मला एवढी मेहनत करावी लागली नसती.
त्या दिवसाचे काम पूर्ण करुन तो घरी गेला परंतु तो जेव्हा घरी गेला. जेव्हा तो घराजवळ पोहचला तेव्हा त्याने गाण्याचा आवाज ऐकला.
काय चालू आहे ?
तुझा भाऊ परत आला आहे आणि तुझ्या वडिलांनी त्याच्यासाठी मोठी मेजवाणी केली आहे.
मोठा मुलगा रागात येऊन घरात जाईना. लगेच त्याचे वडील बाहेर आले.
मी तुमच्यासोबत घरी राहून तुम्हाला मदत केली तरी तुम्ही माझ्यासाठी कधीच मेजवाणी दिली नाही परंतु माझ्या भावासाठी.....
माझे जे काही आहे ते सर्व तुझेच आहे परंतु तुझा भाऊ परत आला त्याच्यासाठी आनंद करायला हवा. तो मेला होता आता जिवंत झाला आहे.


जेव्हा येशूने ही गोष्ट संपविली तेव्हा लोकांनी ऐकमेकांकडे आश्चर्यरीतीने बघितले.
ह्याच्या म्हणण्याचा हा अर्थ तर नाही ना की गोष्टीतील बाप हा देव आहे.
होय... मी बघतो जर आपण त्याच्याकडे जातो तर देवाची आपण पापी असतांना सुद्धा आपल्याला क्षमा करण्याची इच्छा आहे.
जेव्हा परुश्याने लोकांची प्रतिक्रिया बघितली तेव्हा ते रागात निघून गेले परंतु येशू शिकवतच राहिला. परंतु येशूला मध्येच थांबविले....
येशू ! मरीया आणि मार्थेने मला हे सांगण्यासाठी पाठविले की त्यांचा भाऊ लाजर आजारी आहे. तुम्ही बेथानीस यावे अशी त्यांची इच्छा आहे.....
बेथानी ? ते यरुशलेमेत त्याच्या शत्रूच्या अगदी जवळ आहेत. ते त्याला मारुन टाकतील.

# कबरेतून बोलाविणे

योहान ११ : ३८-५४, लूक १८ : १५-२३; १९ : १ : ३






मेलेला माणूस मरणातून जिवंत झाला ! लोकांनी जे पाहिले त्यावर ते गुप्तरीतीने विश्वास ठेऊं शकत होते. त्यांच्यापैकी अनेक लोक मसीहा ! देवाचा पुत्र म्हणून ओरडत आले. परंतु अन्य लोक यरुशलेमेत परुश्यांकडे जे पाहिले ते सांगत गेले.






तुला कळत नाही कां ? संपूर्ण राज्याला संकटात टाकण्यापेक्षा येशूला मारणे बरे.
कयफा हा चतूर आहे. येशूला मारण्याचे त्याला कारण सापडले आणि त्याचा मार्ग देखील त्याला सापडेल.
जेव्हा येशूला त्याल: मारण्याचा नवीन कट कळतो तेव्हा शत्रुसमोर येण्यांची वार पाहण्याकरिता तो शांत ठिकाणी निघून जातो.
वल्हांडणाचा सण जसा जवळ येतो संपूर्ण पॅलेस्टाईनहून लोक यरुशलेमेस... जाण्यास निघतात. येशू देखील त्याच्यांत सामील होतो.
वाटेत लोकसमुदाय येशूला पाहण्यास व त्याचे ऐकण्यास उत्सुक असतात.
नाही...नाही...तुमच्या मुलांना दूर करा. येशू व्यस्त आहे...
परंतु माझी इच्छा आहे की येशूने माझ्या लहान मुलाला आशीर्वाद द्यावा
लेकरांना माझ्याकडे येऊ द्या..कारण स्वर्गाचे राज्य अशा सारख्यांचेच आहे. जे प्रेमळ व विश्वासू आहेत.







परंतु त्या तरूण मनुष्याने स्वतःच्या श्रीमंतीचा जास्त विचार केला...तो हळूच येशूकडे पाठ करून तेथून निघून गेला.






# झाडावर मनुष्य

लूक १९:४-१०; योहान १२ : १-८; लूक १९ : २९-३५

जक्कय, जो श्रीमंत जकातदार ठेंगणा असल्यामुळे लोकांच्या गर्दीमुळे येशूला बघू शकत नव्हता. आतुरतेने तो जमावाच्या पुढे पळून उंबराच्या झाडावर चढतो आणि येशू येण्याची वाट बघतो. जेव्हा येशू त्याला बघतो तेव्हा येशू तिथे थांबतो.....






वल्हांडणाच्या मोठ्या सणासाठी यरीहोहून मोठी गर्दी यरूशलेमेच्या वाटेवर होती. सणाला आणखी सहा दिवस बाकी असतात. म्हणून येशू बेथानी ह्या ठिकाणी आपले मीत्र मरीया, मार्था आणि लाजरस ह्यांची भेट घेण्याकरिता थांबतो. शिमोन जो कुष्ठरोगी होता त्याच्या घरी भोजन चालले असता मरीया येशूजवळ खाली वाकून त्याच्या पायांना मूल्यवान सुगंधी तेलाने तैलाभ्यंग करते. नंतर आपल्या केसांनी ती ते पुसते.




ह्यामुळे यहुदाला राग येतो आणि दुष्ट विचार त्याच्या मनात येतात.
योग्य वेळ येईल तेव्हा मी शास्त्री आणि परूश्यांकडे जाईल....मांझे ऐकण्यात त्यांना आनंद वाटेल.
दुसऱ्या दिवशी येशू व त्याचे शिष्य लोकसुदाया सौबत वल्हांडण सणाकरिता यरुशलेमेस जातात. वाटेत...
समोरच्या गावात जा आणि तुम्ही प्रवेश केल्याबरोबर तुम्हाला एक शिंगरू दिसेल. त्याला माझ्याकडे आणा आणि कोणी तुम्हाला काही प्रश्न विचारेल तर त्याला सांगा की प्रभुला त्याची गरज आहे आणि मी ते परत करीन.
दोन शिष्य गावांत जातात त्या ठिकाणी शिंगरू दिसते जेव्हा ते
तुम्ही माझे जनावर कसे घेत आहात ?
येशूने तुम्हाला सांगण्यास सांगितले की त्याला ह्याची गरज आहे.
येशूचे नाव सांगितल्याबरोबर तो मनुष्य ते आनंदाने देतो.
मला नवल वाटते येशूला माझ्या शिंगराची गरज का आहे ? यावर कधीच कोणी बसले नाही. याव्यतिरीक्त हे इतके आदर्शाचे जनावर नाही की येशूसारखा इतका महान पुरुष यावर बसावा.

# जयोत्सवाने प्रवेश

लूक १९ : ३६ - ३८; मत्तय २१:१०-१७



आठवड्याचा पहिला दिवस असतो. यरूशलेमेचा मार्ग यहूद्यांचा वल्हांडण सण साजरा करण्याकरिता लोकांच्या गर्दीने भरला असतो. येशूच्या सांगण्यावरून त्याचे शिष्य हे लहान जनावर आणतात तो त्यावर बसतो आणि ह्या यात्रेकरूंमध्ये शामील होतो. ते त्याच्यासाठी वाट मोकळी करतात; वाटेवर स्वतःचे वस्त्र व झावळ्या अंथरतात आणि त्याचा जयोत्सव करीत शहरात प्रवेश करतात. त्यांच्या जयोत्सवाचा नाद वातावरणात भरून जातो. "होसान्ना ! होसान्ना ! प्रभूच्या नावाने येणारा राजा धन्यवादीत असो.


यरूशलेमेच्या पूर्वीपासूनच्या इतिहासात प्रवेशद्वाराने निरनिराळ्या प्रकारच्या मिरवणुकी निघाल्या...घोड्याच्या पाठीवर राजेलोक बसून जात असे आणि ज्यांनी युद्धात विजय मिळविले किंवा राज्ये जिंकली ते आपला पोशाख घालून मिरवणुकीत दिसत असत...परंतु अशा प्रकारची मिरवणूक पहायला मिळाली नव्हती.
हा मनुष्य कोण आहे ?
नासरेथचा संदेष्टा, येशू।


परंतु येशू येत आहे ही वार्ता शहरामध्ये आधीच पसरली व जेव्हा तो मंदिराजवळ जातो तेव्हा त्याला आंधळा, लंगडा व आजारी लोक त्याची वाट पाहतांना दिसतात.
माझ्या मुला, उठ आणि चालू लाग.
दावीदाच्या पुत्रास होसान्ना !


लेकरे जयघोष करतात म्हणून शास्त्री व परूश्यांना राग येतो.
ते काय म्हणत आहेत हे तूं ऐकत आहेस कां ?
होय, आणि तुम्ही स्तोत्रसंहितेत वाचले नाही कां की लेकरांच्या मुखातून देव खरी स्तुति करून घेईल ?
त्या संध्याकाळी येशू बेथानी या ठिकाणी परत जातो. परंतु सोमवारी जेव्हा तो यरूशलेमेतील मंदिरात परततो.....
मी फार लांबून देवाला यज्ञ अर्पण करण्यासाठी आलो आहे. परंतु मी या कबुतरासाठी इतकी किंमत देऊं शकत नाही.
दुसरा कोणीतरी देईल...तूं पुढे जा.
शुद्ध रागाने येशू सर्व व्यापाऱ्यांना मंदिराबाहेर काढतो.
शास्त्रभागात असे लिहले नाही कां की माझे मंदिर हे प्रार्थनेचे मंदिर म्हणून ओळखल्या जाईल ? परंतु तुम्ही याला चोर व लुटारूंची गुहा करून ठेवली आहे.




जेव्हा येशू उपदेश करण्यास सुरूवात करतो तेव्हा लोक मंदिरात त्याचे ऐकण्यास गर्दी करतात. परंतु शास्त्री व परूशी बंद दरवाज्यामागे त्याच्या विरूद्ध योजना करतात. मंगळवारी ते आता तयार आहेत....



# महान आज्ञा

लूक २०:२३-२६; मार्क १२:२८-३४, ३८-४४, १३; मत्तय २६:१४-१६




शांतपणे येशू नाणे परत करतो.
कैसराचे ते कैसराला द्या व देवाचे ते देवाला द्या.
परत अपयशी झाल्यामुळे परूशी चिडले. परंतु ह्या फसव्या प्रश्नाला कुशलतेने येशूने उत्तर दिल्यामुळे त्यांना नवल सुद्धा वाटले. नंतर त्यांनी परत एक कठीण प्रश्न विचारला.
आपल्या ६१३ आज्ञांपैकी कोणती आज्ञा सर्वात महत्त्वाची आहे ?
तूं आपल्या संपूर्ण मनाने, संपूर्ण जीवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तिने देवावर प्रीति कर व दुसरी ही आहे की जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर.
तुम्ही खरे बोललात. देवावर व आपल्या शेजाऱ्यावर प्रीति करणे अर्पणांपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.
तूं देवाच्या राज्यापासून जास्त लांब नाहीस.


नंतर येशू लोकांना इतरांनी चांगले म्हणावे म्हणून चांगले कृत्य करावे याविरुद्ध ताकीद देतो. त्याचे बोलणे झाल्यावर तो एका गर्विष्ठ मनुष्याला जास्त पैसे मंदिराच्या दानपेटीत टाकतांना बघतो.
नंतर एक गरीब स्त्री नम्रतेने दोन नाणे दान पेटीत टाकते.
इतरांपेक्षा या स्त्रीने अधिक दिले. कारण तिच्याजवळ जे काही होते ते सर्व तिने देवाला दिले.
असे बोलून येशू मंदिरातून जातो..... शेवटल्या घटकेस यरुशलेमेच्या बाहेर जैतुनाच्या डोंगरावर शांत ठिकाणी येशूचे शिष्य त्याला भविष्याविषयी विचारतात. तो सांगतो की त्याचे शुभवर्तमान संपूर्ण जगाला सांगायला हवे..... आणि नंतर तो परत न्याय करण्यास येईल.


येशू व त्याचे शिष्य बेथानी येथे परततात. त्या रात्रीनंतर यहूदा यरूशलेमेस जाण्याची घाई करतो जेणेकरुन तो मरीयेने येशूचा तैलाभ्यंग केला होता तेव्हा त्याच्या मनात जे विचार आले होते ते पूर्ण करू शकेल.
मला मुख्य याजकास भेटायचे आहे.
यहूदा इस्कार्योत नावाच्या मनुष्याला तुम्हाला भेटण्याची इच्छा आहे. तो लवकर भेटणे महत्त्वाचे आहे असे म्हणतो
यहूदा इस्कार्योत ? कां ? तो येशूच्या शिष्यांपैकी एक आहे. त्याला आंत बोलवा.
मला माहीत आहे येशूमुळे तुम्ही किती त्रासले आहात. त्याला पकडून देण्यास तुम्ही मला काय द्याल ....जे लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात ते नसतांना मी त्याला पकडून देईल.
चांदिचे तिस रुपये.

# गुप्तपणे..वरच्या माडीवर

लूक २२ :७-१३; योहान १३:१-२०; २७-३०, मत्तय २६:२१-२५




तो मनुष्य त्यांना लगेच जिन्यावरून वरच्या मोठ्या खोलीत घेवून जातो.
येशू माझ्याघरी वल्हांडण सण साजरा करीत आहे म्हणून मला अभिमान आहे.


पेत्र व योहान भोजनाची तयारी करतात आणि त्या संध्याकाळी येशू बारा शिष्यांसह वरच्या खोलीत सहभागी होतो. ते बसल्यावर येशू वाकून दासाप्रमाने शिष्यांचे पाय धुण्यास सुरुवात करतो.
नाही,, प्रभु, तूं असे करावे असा मी पात्र नाही !


पेत्रा, जर तूं मला तुझी सेवा करूं देणार नाहीस, तर तुला माझ्या राज्यात प्रवेश मिळणार नाही.




थोड्याच वेळानंतर येशू हालवून देणारे विधान करतो.







लगेच घात करणारा उठून घाईत बाहेर निघून जातो. इतर शिष्यांना कळत नाही की तो बाहेर कां गेला ?




प्रभूभोजन
लूक २२: १७ - २०; योहान १३:३३-३८, १४; मत्तय २६ : ३०, ३६-५६
विश्वासघातकी यहूदा सोडून गेल्यावर येशूने भाकरीचा तुकडा उचलला व त्यासाठी देवाला धन्यवाद दिला आणि नंतर ती मोडून शिष्यांना दिली व म्हटले, "हे माझे शरीर आहे." जेव्हा त्यांनी भाकर खाल्ली तेव्हा त्याने त्यांना द्राक्षरसाचा प्याला दिला.
तुम्हापैकी प्रत्येकाने हे प्या, कारण हे माझे रक्त आहे जे तुमच्या पापाचे मोल देण्यासाठी सांडले गेले. मी गेल्यावर तुम्ही माझ्या स्मरनार्थ हे करा.
अशाप्रकारे येशूने देवामध्ये व मानसामध्ये एक नवीन करार केला. जेव्हा प्रत्येक व्यक्ती येशूच्या नावात ही भाकर खाईल व हा द्राक्षरस पिईल तेव्हा त्यांना ह्या गोष्टीची आठवण होईल की देवाने त्याच्या पुत्राच्याद्वारे त्यांना पापाच्या बंधनातून सोडविले.


थोड्याच वेळात मी तुम्हाला सोडून जाणार आहे. तुम्ही माझ्या मागे येऊ शकत नाही ; परंतु जाण्यापूर्वी मी तुम्हाला आठवण करून देतो की मी जशी तुमच्यावर प्रीति केली तशी तुम्ही एकमेकांवर प्रीति करा.
प्रभू, मी तुझ्यामागे का येऊ शकत नाही ? तुला माहीत आहे की मी माझे संपूर्ण जीवन तुला दिले आहे.
पेत्रा, तू मला आज कोंबडा आरवण्यापूर्वी तीन वेळा नाकारशील.
माझ्या प्रभूला नाकारील ? कधीच नाही ! त्याला सर्वप्रथम दुखापत करणाऱ्याविरूद्ध माझी तलवार ह्या क्षणालाच तयार आहे.
येशूच्या सोडून जाण्याच्या विचारानेच शिष्य घाबरून गेले होते.
घाबरू नका. देवावर विश्वास ठेवा. माझ्यावरही विश्वास ठेवा. जर तुम्ही माझ्यावर प्रीति करता तर माझ्या आज्ञा पाळा. मी देवाजवळ प्रार्थना करीन की तुम्हाला सांत्वन देण्यासाठी त्याने पवित्र आत्मा पाठवावा. तो नेहमी तुमच्यासोबत राहीन. या,आता जाण्याची वेळ आली आहे.......


शांत रीतीने त्यांनी वरची खोली सोडली. पूर्वेच्या प्रवेशद्वाराहून ते चंद्राच्या प्रकाशात रस्त्यावरुन चालत येत होते. व गेथशेमेने बागेच्या खालीच्या वाटेने जैतूनाच्या डोंगरावर गेले.
प्रवेशद्वाराजवळ येताच येशू आपल्या आठ शिष्यांना म्हणाला की तुम्ही इथेच थांबा मी पेत्र, योहान व याकोब सोबत बगिच्यांत जाऊन येतो.
आजची रात्र माझ्यासाठी अतिशय दुःखाची रात्र आहे.... प्रार्थनेसाठी मी एकटा जाऊन येईपर्यंत इथेच थांबा व जागृत राहा.
माझ्या देवा तुझी इच्छा असेल तर हा प्याला माझ्यापासून दूर कर तरीपण माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो
जेव्हा येशू परत त्याच्या शिष्यांकडे आला तेव्हा ते त्याला झोपलेले आढळले. अजून दोनदा येशू प्रार्थनेसाठी गेला व जेव्हा जेव्हा तो परत आला तेव्हा तिसऱ्यांदा त्यांना उठविल्यानंतर ते त्याला गाढ झोपलेले आढळले...
उठा, जागे व्हा. मला धरुन देणारा पहा जवळ आला आहे.


जेव्हा येशू बोलत होता, यहूदाने काही माणसांसोबत बागेत प्रवेश केला. करारानुसार त्याने चुंबन घेऊन येशूची ओळख करून दिली.
अभिवादन, गुरुजी.


सैनिकाने येशूचा ताबा घेताच पेत्राने आपली तलवार म्यानातून काढून एका चाकराचा कान कापला.
पेत्रा, तुझी तलवार आंत ठेव. तूं असा विचार करतो कां की मी माझे संरक्षण करण्यासाठी देवाला दुतांचा थवा पाठवा असे म्हण् शकत नाही ?


शांतरीतीने येशूने त्या माणसाचा कान बरा केला. जेव्हा शिष्यांनी पाहिले की येशू स्वतःला वाचविण्यासाठी काहीच प्रयत्न करीत नाही तेव्हा ते आपला जीव वाचवण्याकरिता पळाले. अधिकाऱ्याच्या आज्ञेनुसार सैनिकांनी येशूला बांधले व ते त्याला यरुशलेमेस, जेथे त्याचा काही दिवसांपूर्वीच जयघोषाने प्रवेश झाला होता, तेथे परत घेऊन गेले.

## प्रयत्न....आणि नाकारले !

मत्तय २६ : ५७-७५; योहान १८:२८-३८; लूक २३:६-१२







जेव्हा येशू ही अपमानास्पद वागणूक सहन करीत होता, पेत्र ...जो गुप्तरीतीने त्याला त्या शहरात अनुसरत होता.....राजवाड्याच्या प्रांगणात आपले हात शेकत होता. जेव्हा तो हात शेकत होता, एक स्त्री तिथे थांबली व त्याच्याकडे पाहिले.....
नासरेथच्या येशूसोबतच्या पैकीचा तूं एक आहेस.
मी ? मला माहीत नाही तूं कशाबद्दल बोलते ते.
दुसऱ्या अनेक प्रश्नांच्या भितीने पेत्र हॉलच्या आत गेला, परंतु तेथे..........
हा मनुष्य येशूसोबत होता.
येशू ? हा कोण आहे हे मला माहीत सुद्धा नाही.
काही एक तासानंतर काही मनुष्य त्याच्याकडे आले.
जेव्हा सैनिकांनी येशूला धरले तेव्हा बागेत मी तुला पाहिले नाही कां ?
तूं येशूसारखाच गालीली दिसतो, तुझ्या बोलण्याच्या पद्धतीवरून मी हे सांगू शकतो.


तिसऱ्यांदा पेत्राने येशूला ओळखत नसल्याचे सांगितले आणि नंतर कोंबडा आरवला. भीतिने, पेत्राने त्याचे हात वर उचलले..... येशूच्या ज्याला न्यायालयाकडे घेऊन चालले होते त्याच्या नजरेस सरळ पाहिले.
लाजेने, पेत्र बाहेर पडला आणि खुप मोठ्याने रडला.
तिनदा मी माझ्या देवाला नाकारले... ज्याप्रकारे मी हे करीन असे तो बोलला होता ! हे देवा, मला क्षमा कर.मला क्षमा कर !
शुक्रवारच्या सकाळी काही तासांपूर्वी यहूदी न्यायालयाच्या सदस्यांनी जे त्याला मरणदंडाचे शिक्षा देऊ शकत नव्हते, ते येशूला रोमी राजा पिलाताकडे घेऊन गेले. बुद्धी चातुर्याने, त्यांनी त्याच्यावर दोषारोप केला... फक्त यहूदी कायदाच तोडला नाही....तर रोमविरूद्ध देशद्रोह केला आहे.
पिलाताने येशूला गुप्तपणे प्रश्न विचारले आणि नंतर तो बाहेर असलेल्या गर्दीत आणि याजकाकडे परत आला.
मला या मनुष्यामध्ये कोणत्याही प्रकारचा दोष आढळला नाही.




पिलात मध्ये अडकतो. त्याचा विश्वासच नसतो की येशू दोषी आहे. "परंतु जर मी याला सोडून दिले" तो स्वतःशीच बोलतो. "यहूदी पुढारी त्रास देतील व रोमी सरकार त्याबद्दल मला जबाबदार धरेल". शेवटी तो स्वतःला वाचविण्याचा मार्ग अवलंबवितो.



## मरण्याकरिता दोषी ठरविले

योहान १८: ३९-१९:१६, मत्तय २७: ३-१०

यहूदी पुढाऱ्यांनी येशूवर रोमी सरकारविरूद्ध राष्टद्रोह करण्याचा दोषारोप लावला. पिलात जो रोमी सुभेदार होता त्याचा येशू निर्दोष आहे असा विश्वास होता. परंतु तो यहूदी पुढाऱ्यांना घाबरला की ते रागात त्रास देऊन चुकीचे अहवाल रोमी सरकारापर्यंत पोहंचवतिल. वल्हांडण सणाला यरूशलेमेत आलेल्या मोठ्या लोक समुदायाला पाहून त्याला लगेच एक मार्ग सुचला. त्याने लोकांवर येशू मरावा की नाही याचा निर्णय घेण्याचे सोडले. परंतु त्याला याची कल्पना नव्हती की शास्त्री व परूशी लोकांना येशूविरूद्ध भडकवित आहे.




पिलात येशूला वाचविण्याकरीता आणखी एक प्रयत्न करतो.
त्याला फटके मारा.
जर या बंदिवानाला शिक्षा केली तर लोकांचे समाधान होईल.


येशूला चमड्याच्या चाबकाने फटके मारण्यात आले व शिपायांनी त्याच्या डोक्यात काट्यांचा मुकुट घालून त्याची खिल्ली उडविली
यहूद्याच्या राजाला नमन !


येशूला वाईट रीतीने मारण्यात आले व त्याचे वाईट दृष्य लोकांच्या मनात दया उत्पन्न करेल म्हणून पिलाताने येशूला लोकांपुढे आणले.
हा मनुष्य बघा !
त्याला वधस्तंभावर खिळा !
त्याला वधस्तंभावर खिळा !




हा पिलाताचा बदला होता. त्याला माहीत होते की यहूदी पुढारी ज्यांनी येशूला मरण्याकरिता दोषी ठरविले ते क्रुसावर हा लेख पाहून जळतील.




मी पाप केले आहे .......
मी निर्दोष मनुष्याचा घात
केला आहे .
त्याचे आम्हाला
काय ?
हे घ्या .....मला
तुमचे घाणेरडे
पैसे नको.
सहन न करण्याइतक्या
दोषी भावनेमुळे यहूदाने
स्वतःच फाशी घेतली.
परंतु पैसे परत केल्यामुळे
ज्या मनुष्याला त्याने धरून
दिले होते त्याची सुटका
झाली नाही. येशू आता रोमी
सैन्यांच्या ताब्यात आहे .......
......ते त्याच्या खांद्यावर
क्रुसखांब लादतात व जी वाट
कलवरीच्या डोंगरावर जाते
त्या वाटेने त्याला नेतात.

# राजाला क्रुसखांबावर खिळणे

लूक २३: २६-४६,योहान १९: २५-२७

सर्व पॅलेस्टाईनमधून वल्हांडण साजरा करण्याकरिता आलेले आनंदीत व उत्साहीत यात्रेकरू यरूशलेमेत गर्दी करीत होते. परंतु शुक्रवारच्या सकाळी ही दु:खदायी खबर वाऱ्याप्रमाने संपूर्ण शहरात पसरली . देषद्रोहाकरिता नासरेथ येथील येशूला क्रुसखांबावर खिळण्यात येणार आहे !

जी वाट अपराध्यांना शिक्षा होणाऱ्या टेकडीवर जात होती ती आता निरनिराळ्या लोकांनी, शास्त्री व परूश्यांनी जे येशूचे मरण इच्छित होते त्यांनी भरून गेली होती. स्त्रीया ह्या मनुष्याकरिता रडत होत्या ज्याने लोकांच्या पापाची क्षमा केली व आजाऱ्यांना बरे केले. आणि काही लोकांना दोषारोप लावलेल्या मनुष्याला क्रुसखांब नेतांना बघण्याचीच इच्छा होती .




वाटेत येशू जड क्रुसखांबाखाली पडतो. ही मिरवणूक पुढे चालविण्याकरिता रोमी सेनाधिपतीने कुरेनेकर शिमोन यास धरून त्याच्यावर वधस्तंभ लादला.
हा क्रुसखांब वाहून ने!


आता सकाळचे जवळ जवळ नऊ वाजले होते. जेव्हा येशू, दोन चोरांना खिळण्याकरिता कॅलवरीवर नेले होते आणि त्या ठिकाणी देवाच्या पुत्राला क्रुसावर खिळ्यांनी खिळले. त्याच्या डोक्यावर एक लेख लावलेला आहे "नासरेथकर येशू , यहूद्यांचा राजा."
हे पित्या, यांना क्षमा कर कारण हे काय करतात हे त्यांना समजत नाही.


परंतु रोमी सैन्यांकरिता हा इतर अपराध्याप्रमाणे अपराधीच होता. ज्याला रोमी नियमाप्रमाणे मृत्युदंड होता.
हा झगा न शिवलेला आहे. याला आम्ही कसे वाटून घ्यावे.
हे इतके चांगले आहे की ह्याचे तुकडे करूं नये. चला ह्यासाठी आपण चिठ्ठ्या टाकूं.
येशूचे मित्र हे पाहात असता आणि आतूर असलेला जमाव त्या वाटेने जात असता ज्या लोकांनी त्याला धरून दिले होते ते त्याची चेष्टा करीत होते.
जर तू इस्राएलचा राजा आहे तर क्रुसावरून खाली उतर. तेव्हा आम्ही तुझ्यावर विश्वास ठेऊं.
तर तूं ख्रिस्त आहे तर स्वतःला वाचीव व आम्हाला वाचीव.


मरत असतांना तुला असे बोलण्याची
भीति वाटत नाही कां ? आम्हाला
पल्या अपराधांबद्दल शिक्षा होत आहे
रंतु ह्या मनुष्याने काहीच वाईट केले
नाही.
प्रभु ,तूं वैभवाने
येशील तेव्हा
माझी आठवण
ठेव.
आज तूं मजबरोबर
सुखलोकांत असशील
आणि येशूने खाली त्याच्या
आईकडे बघितले. तो
दुःखात असतांना सुद्धा
त्याला त्याच्या आईची
काळजी होती. कारण
पुष्कळांच्या दृष्टीने ती
अपराध्याची आई होती
योहाना, माझ्या
आईची काळजी घे.
योहानाने तिला
आपल्या घरी नेले..
आणि आपल्या
आईप्रमाणे तिची
काळजी घेतली
आता दुपार झाली होती एक निराळी सावली हळूवारपणे
ा जागेवर पडली. तीन तास अंधार होता. मग येशूने
वाजवळ आरोळी केली
पित्या, मी आपला आत्मा
तुझ्याहाती सोपवितो
आणि असे केल्यावर तो मरण पावला.
पृथ्वी कंपीत झाली आणि यरूशलेमेत.......

# शिक्कामोर्तब असलेली कबर

मार्क १५:३८,३९ लूक २३: ४८,४९; योहान १९: ३८-४२
मत्तय २७: ६२-६६




शहराबाहेर, रोमी सेनाधिपती ज्याने क्रुसखांबावर खिळण्याच्या कामामध्ये सैनिकांचे मार्गदर्शन केले तो हे सर्व घडलेले पाहून हादरून गेला. तो आदरयुक्त दृष्टीने वर या मनुष्याकडे पाहतो ज्याने आपल्या शत्रुंची क्षमा केली .
खरोखर हा मनुष्य देवाचा पुत्र होता !
लोक सुद्धा ह्या मरणदंडामुळे हादरून गेले. ते नगराकडे वळले तेव्हा........
मांझी आशा होती की हा आपल्याला ेमी लोकांपासून सो ल.
यरूशलेमेत अरीमथाईकर योसेफ जो यहूद्याच्या उच्च सभास्थानाचा सदस्य होता व गुपित पणे येशूचा अनुयायी होता. तो धीटपणे पिलाताकडे जातो.
मला येशूचे शरीर मिळेल काय जेणेकरून आम्ही शब्बाथाच्या पूर्वी उत्तरक्रिया करू शकू
होय..... मी माझ्या सेनाधीपतींना आदेश देतो.


आदर भावनन यासफ येशूचे शरीर क्रुसखांबावरून घेऊन जातो. तो व त्याचा मित्र निकदेम त्याचे शरीर तागाच्या वस्त्रांनी गुडांळून योसेफाच्या बागेत असलेल्या कबरेत ठेवतात
दुसऱ्या दिवशी शास्त्री व/परूशी पिलाताकडे जातात.
आम्हाला आठवते की येशू म्हणाला होता की तीन दिवसानंतर येशू मरणातून पुन्हा उठेन. तुमच्या सैनिकांना कबरेवर शिक्कामोर्तब करायला व पहारा करण्यास सांगा जेणेकरून त्याचे शिष्य त्याचे शरीर चोरून घेऊन जाणार नाही आणि तो मेलेल्यांतून उठला आहे असे लोकांस सांगणार नाही.
सैनिकांना तू घेऊन जा आणि तीन दिवसापर्यंत तेथे पहारा ठेव.
म्हणून कबर शिक्कामोर्तब करण्यात आली, आणि रोमी सैनिकांचा पहारा ठेवला.
आता हा मनुष्य जो स्वतःला देवाचा पुत्र म्हणत होता त्याच्या विषयी आता आम्हाला ऐकायला मिळणार नाही.

# देव जिवंत झाला

मार्क १६:१-७; योहान २० : २-१८; मत्तय २८ : ११-१५; लूक २४: १३-३२




परंतु तिसऱ्या दिवसाच्या सकाळीच पृथ्वी हालली आणि देवाच्या देवदूतांनी धोंड बाजूला सरकवली. सैनिक घाबरून जमीनीवर पडले. जेव्हा त्यांना परत उठता आले तेव्हा ते घाईने नगरात धावत गेले.



कोणीतरी येशूचे शरीर चोरून नेले आहे असा विचार करून मरीया यरूशलेमेला पेत्र आणि योहान ह्यांना सांगण्यासाठी पळत गेली. परंतु दुसऱ्या कबरेच्या आत गेल्या... तेथे देवदत बसलेला आढळला




मरीयेने सांगितलेली बातमी ऐकून पेत्र व योहान घाबरून तिच्यापुढे धावत गेले. जेव्हा ते कबरेजवळ पोहंचले ...




मरीया बागेत आली तोपर्यंत सर्व निघून गेले होते. ती दुःखी असल्यामुळे, तिला प्रश्न विचारणाऱ्याचा आवाज ती ओळखत नाही.




हळूवारपणे येशूने तिचे नाव घेतले...."मरीये"! ती वळली....आणि तिच्या जिवंत झालेल्या प्रभुला पाहते.
गुरूजी !


बागेमध्ये घडलेल्या गोष्टीबद्दल फक्त शिष्यच उत्सुक नव्हते. यरुशलेममध्ये रोमी सैनिकांनी परूशी व याजकाला ही बातमी कळवली. जर हे सत्य सगळीकडे पसरले तर काही पण घडेल या भीतिने त्यांनी लगेच कार्य केले.
हे पैसे घ्या आणि लोकांना असे सांगा की येशूच्या शिष्यांनी त्याचे शरीर चोरून नेले.


सैनिकांनी ही खोटी बातमी पसरविण्याच्या वेळेपर्यंत, येशू आपल्या दोन शिष्यांना अम्माऊस गावाच्या रस्त्यावर भेटला. ते त्याच्यासोबत बोलले परंतु त्यांना तो कोण आहे हे माहीत नव्हते.


अम्माऊसमध्ये त्या रात्री जेवन करीत असतांना येशूने भाकरीवर आशीर्वाद मागितला......आणि जेव्हा त्याने ती त्याच्या हातात दिली त्यांनी एकदम त्याला ओळखले.
आणि त्याच क्षणाला तो त्यांच्या नजरेपासून अदृष्य झाला.

# बंद खोलीत

लूक २४:३३-४३; योहान २०: १९-२१ : ६







होय. आम्हाला माहीत आहे. मरीया मग्दालीनीने त्याला पाहिले आणि पेत्राने सुद्धा
होय, तो माझ्याकडे सुद्धा आला... जो असा मी ज्याने त्याला नाकारले होते
अचानक येशू त्यांना खोलीत दिसला. परंतु शिष्य असा विचार करीत होते की ते भूत बघत आहेत
तुम्ही का भित आहात ? हा मी आहे...माझे हात आणि पाय बघा
हे प्रभू, खरोखरच तूं आहे ?
मला काही अन्न द्या आणि ते मी खाईन जेणेकरून तुम्ही हे पाहू शकाल की मीच आहे.
लगेच ते थोमास शोधण्यास गेले.
येशू उठला आहे ! आम्ही त्याला बघितले आहे
मी जोपर्यंत त्याच्या हातात खिळ्याचे व्रण पाहणार नाही तोपर्यंत मी विश्वास ठेवणारच नाही.


एका आठवड्यानंतर जेव्हा शिष्य परत बंद खोलीत भेटले तेव्हा थोमा त्यांच्यामध्ये होता. पुन्हा एकदा येशू त्यांना दिसला.
थोमा माझ्या हाताला स्पर्श कर व माझ्या कुशीत हात टाकून बघ.
माझ्या देवा, माझ्या प्रभो !
थोमा तू बाघतल्यामुळे माझ्यावर विश्वास ठेवला. धन्य आहेत ते ज्यांनी न पाहता माझ्यावर दिश्वास ठेवला.
पुन्हा येशू त्यांच्या नजरेपुढून गेला.
येशूने त्यांना दिलेली आज्ञा पाळण्यासाठी शिष्य गलीलीच्या उत्तरेला गेले. एके संध्याकाळी ते मासे धरण्यासाठी गेले असता त्यांनी रात्रभर मासे धरले परंतु त्यांना काहीच मिळाले नाही. सकाळ होताच त्यांनी किनाऱ्यावर एका आकृतीला उभे असलेले पाहिले.
तुमचे जाळे नावेच्या उजव्या बाजूला टाका.
त्यांनी तसे केले.....
अचानक संपूर्ण जाळे मासांनी इतके भरले की ते ओढू शकत नव्हते.

# शेवटची आज्ञा

योहान २१:७-१८; मत्तय २८ : १६-२० ; लूक २४:४४-५१









परत दोनदा येशूने हाच प्रश्न त्याला विचारला आणि प्रत्येक वेळेस पेत्राने त्याची निष्ठा प्रकट केली. नंतर येशूने त्याला मोठी कामगीरी दिली.




काही दिवसानंतर येशू त्याच्या 500 अनुसरणाऱ्यांना जे गलीली समुद्राच्या जवळच्या पर्वतावर जमलेले होते तिथे दिसला. त्याने त्यांना महान कामगीरी दिली.




हे अनुसरून अकरा शिष्य यरुशलेमेला परतले. तेथे येशू त्यांना भेटला व त्याने त्यांना ह्याचे स्पष्टीकरण दिले की कशाप्रकारे तो त्याच्या मृत्यूद्वारे आणि पुनरूत्थानाद्वारे देवाची कामगीरी पूर्ण करून जगाचा तारणारा झाला. कार्य पुढे नेण्यास तो त्यांना सांगतो व त्यांना म्हणतो, "परंतु पवित्र आत्म्याद्वारे देवाचे सामर्थ्य तुम्हामध्ये येईपर्यंत यरुशलेमेतच राहा."
त्याच्या पुनरूत्थानानंतर चाळीसाव्या दिवशी येशू आपल्या शिष्यांना घेऊन बेथानीजवळ असलेल्या जैतूनाच्या डोंगरावर गेला. आणि जेव्हा तो त्यांना आशीर्वाद देत होता तेव्हा तो स्वर्गात उचलल्या गेला.

## तुम्ही कशाप्रकारे देवाच्या कुटुंबात भाग घेऊ शकता.

देव कुटुंबावर प्रीति करतो. या जगाला बनविल्यानंतर त्याने पहिले कुटुंब बनविले, पुरुष व स्त्री. त्यांचे नाव आदाम व हवा होते. त्यांचे पहिले घर हे एदेन बाग होते, सर्व चांगल्या गोष्टींचे ठिकाण.




देव हा चांगला देव आहे आणि आदाम व हवे बद्दल चांगल्या गोष्टी घडाव्या अशी त्याची इच्छा आहे. देवाने त्यांनी काय करावे व काय करु नये हे सांगितले. आदाम व हवेला देवाची आज्ञा पाळण्याचे व न पाळण्याचे स्वातंत्र्य होते.




सैतान देवाचा द्वेष करतो. सैतान आदाम व हवेच्या घरी एदेन बागेत सापाच्या रूपात आला. सैतानाने हवेला सांगितले की देवाने त्यांना सत्य सांगितले नाही आणि हवेने सैतानाने जे त्या फळाबद्दल सांगितले त्यावर विश्वास ठेवला. त्या फळाची चव पाहू नये ह्याची आदामाला जाणीव होती परंतु त्याने देवाची आज्ञा मोडण्याचा निश्चय केला.

जेव्हा आदाम व हवेने देवाची आज्ञा मोडली, काहीतरी भयानक घडले. त्यांना भीति वाटू लागली व ते देवापासून लपण्याचा प्रयत्न करू लागले. देवाने त्यांना सांगितले की त्यांनी पाप केले व त्यांना एदेन बाग सोडावी लागेल. आनंदी जग होण्याच्या ऐवजी पृथ्वी हे दुःखाचे स्थान बनले. प्रीति ऐवजी त्याठिकाणी द्वेष आला आणि लोकांनी एकमेकांना जिवे मारण्याची सुद्धा सुरुवात केली.







काइन व हाबेल हे आदाम व हवेची दोन मुले होती. देवाने त्यांना सांगितले की जर त्यांना वाटते की त्यांच्या पापांची क्षमा व्हावी तर त्यांनी एक चांगले पुष्ट जे शुद्ध आहे असे एक वासरू अर्पण करावे. काइनाने शेतीची चांगली उपज केली, त्याने ते परमेश्वराला अर्पण केले. परंतु देव त्यांच्या अर्पणाशी आनंदी नव्हता कारण त्याने देवाने दिलेल्या सुचना पाळल्या नव्हत्या. काइन हा हेवेखोर झाला. देवाने त्याच्या भावाचे अर्पण स्वीकारले परंतु त्याचे नाही. आणि म्हणून त्याला राग आला व त्याने हाबेलाचा खून केला.

लोक पाप करीतच राहिले व शेवटी जग हे आज्ञा न माननारे बनले. म्हणून देवाने एका मनुष्याच्या कुटुंबा व्यतिरिक्त सर्वांचा नाश करण्याचे ठरविले. तो मनुष्य, नोहा देवावर प्रीति करणारा व त्याच्या आज्ञा पाळणारा होता. म्हणून देवाने नोहाला मोठे तारू बांधण्यास सांगितले आणि त्याने तसे केले आणि जेव्हा पाण्याचा वर्षाव झाला तेव्हा त्याचे कुटुंब वाचले.



जे लोक देवावर प्रीति करीत होते ते सर्व लोक शेकडो वर्षापर्यंत त्यांचे पाप क्षमा होण्यासाठी कोंकरू अर्पण करून देवाची आज्ञा पाळीत होते. अधिकाअधिक जग देवाची आज्ञा पाळीत नव्हते आणि आपल्या हातांनी बनविलेल्या देवाची पूजा करीत होते, जे धातूने व लाकडाने बनले होते.

अब्राहाम व त्याची पत्नी सारा हे दोघेही देवावर खरे प्रेम करीत होते. त्यांना एकही मूलबाळ नव्हते, त्यांची ही समस्या त्या दिवसांमध्ये फार भयानक प्रश्न अशी होती. देवाने त्यांना सांगितले की जरी ते म्हातारे झाले आहेत–नव्वद वर्षाच्या वर–तरी पण तो त्यांना एक मूल देईल–तोच हा इसहाक–व त्याचे मोठे राष्ट्र होईल.



अब्राहामाचे इसहाकावर फार प्रेम होते. परंतु एके दिवशी देवाने अब्राहामाच्या जीवनात देवाला प्रथम स्थान आहे का हे बघण्यासाठी त्याच्या विश्वासाची परीक्षा पाहण्याचा निश्चय केला. देवाने अब्राहामाला म्हटले की त्याने त्याचा पुत्र वेदीवर अर्पण करावा. अब्राहामाचा देवावर फार विश्वास होता; त्याने देवाची आज्ञा पाळली परंतु नंतर देवाने अब्राहामाला थांबविले व त्या ऐवजी एक कोंकरू अर्पण करण्यास दिले. दोन हजार वर्षानंतर येशू, देवाचा एकुलता एक पुत्र त्याच ठिकाणी क्रुसावर मारल्या गेला.








जेव्हा कनान देशावर दुष्काळ आला तेव्हा अब्राहामाचे नातवंड इजिप्तला गेले. ज्याठिकाणी इब्री लोक चारशे वर्षापर्यंत राहिले. जेव्हा इजिप्तचे लोक त्यांच्याविरूद्ध उठले आणि त्यांना गुलाम म्हणून काम करण्यासाठी जबरदस्ती केली तेव्हा त्या लोकांनी आकांत करून देवाकडे मदत मागितली. देवाने त्यांची प्रार्थना ऐकली आणि गुलामगिरीतून त्यांचे नेतृत्व करण्यासाठी मोशेला पाठविले.

जेव्हा मोशे इजिप्तच्या राजकन्येला टोपलीत लपवून पाण्यावर तरंगतांना आढळला तेव्हा तो लहान बाळ म्हणून वाचविल्या गेला. अनेक वर्षानंतर देवाने मोशेला जळत्या झुडूपामधून हाक मारली आणि त्याला फारोकडे पाठविले.







जी सर्वात प्रसिद्ध अशी घटना घडली ती म्हणजे, वल्हांडण. जेव्हा देवाने त्याच्या लोकांना इजिप्तच्या गुलामगिरीतून मुक्त केले, तो दिवस अजुनही साजरा करण्यात येतो. मोशेने सांगितले की संपूर्ण इजिप्तमध्ये प्रथम मुलावर मृत्यूची पिडा येईल. परंतु त्यामधूनही त्याने कुटुंबाला वाचविण्याचा मार्ग सांगितला.
नऊवेळा आम्हाला सोडण्यासाठी फारोने त्याचे वचन मोडले. यावेळेस तो काय करेल?
खात्रीने गुलामगिरीतून हे आपली सुटका करेल !
वासराचे रक्त तुम्ही दारावर का लावीत आहात ?
देवाने मोशेला सांगितले की दारावरचे हे रक्त मृत्यू आणणाऱ्या देवदूताकरिता ते घर ओलांडून जाण्यासाठी एक खूण राहील.
त्या संध्याकाळी प्रत्येक इस्त्री कुटुंब इजिप्त सोडण्यासाठी तयार होते. त्यांनी वल्हांडणाचे जेवन खाल्ले कारण मृत्यू घेऊन येणारा देवदूत त्यांचे घर ओलांडून गेला होता.



**ल**गेच दुसऱ्या सकाळी फारोने इब्री लोकांना इजिप्त सोडून जाण्याची परवानगी दिली. नंतर लगेच त्याचे मन परत बदलले आणि त्याने आपले सैन्य मोशे आणि इब्री लोकांच्या मागे पाठविले.

इब्री लोक हे तांबडा समुद्र आणि इजिप्तच्या सैन्याच्या मध्ये सापडले. नंतर एक भीतिदायक घटना घडली ज्याद्वारे हजारो वर्षापर्यंत देवाला गौरव मिळेल. समुद्र मधून दुभांगला आणि इब्री लोक कोरड्या भुमीतून चालत गेले.

या घटनेला निर्गमन असे ही म्हणतात. वल्हांडणाचा सण आणि निर्गमन होने ह्या दोन्ही गोष्टी, देवाने त्याच्या कुटुंबाला कसे वाचविले ह्याचे उदाहरण आहे. ह्या घटना प्रत्येकासाठी पापाच्या गुणधर्मातून सुटण्याचा मार्ग देवाने कसा बनविला ह्याची खूण आहे. आणि ती गोष्ट आपल्या कुटुंबाची झाली.

**एक** हजार पाचशे वर्षानंतर येशूने प्रत्येक वर्षी वल्हांडणाचा सण साजरा केला आणि त्याने आपल्या शिष्यांसोबत घेतलेले शेवटचे भोजन घेतल्यानंतर त्याला मारण्यात आले त्याच्या अगदी पूर्वीचा काळ हा वल्हांडणाचा सण होता.



निर्गमन झाल्यानंतर देवाने मोशेला सिनाय पर्वताच्या वर बोलाविले आणि त्याठिकाणी त्याला दहा आज्ञा दिल्या. लोकांनी कशाप्रकारे जीवन जगावे यासाठी देवाने ह्या सुचना दिल्या होत्या आणि त्या दहा आज्ञा प्रत्येकाच्या मोजमापनीचे साधन आहे जेणेकरून लोक हे पाहू शकतील की देवाच्या उच्च शिक्षणाने ते त्यांचे जीवन जगण्यास ते योग्य होऊ शकत नाही. या दहा आज्ञा मोडण्याला देवाने "पाप" असे म्हटले.





**देव** त्याच्या लोकांसाठी सतत चांगल्या गोष्टी करीत असतांना सुद्धा इस्त्री लोक देवाबद्दल कुरकुर करीत होते व देवाची आज्ञा मोडीत होते. एके दिवशी देवाने त्या लोकांना शिक्षा देण्यासाठी विषारी साप पाठविले, आणि ते सर्पदंशाने लोक मरण पावले.

नंतर लोकांनी त्यांच्या पापांबद्दल क्षमा मागितली आणि देव मोशेला म्हणाला "या सापासारखी प्रतिकृती असलेला मिश्र धातूंचा साप तयार कर आणि त्याला खांबाच्या वरच्या टोकाला जुडवून दे. ज्याला सर्पदंश झालेला आहे असा जो कोणी त्याच्याकडे पाहिल तो जगेल. विश्वास लोकांना त्यांच्या पापां पासून कसा वाचवू शकतो हे ह्या गोष्टीद्वारे उदाहरण म्हणून सांगितले आहे.






अनेकदा इस्राएलचे लोक त्याच्यांसभोवती असलेल्या राष्ट्राद्वारे बनविलेल्या देवांची पुजा करतात आंणि खऱ्या देवाच्या आज्ञा पाळण्याचे विसरुन जातात. नंतर ते देवाजवळ पश्चात्ताप करतात व देवाला क्षमा मागतात. योग्य वासराचे अर्पण करणे हे त्यांचे पाप क्षमा होणे आणि देवासोबत चांगले संबंध होणे असे होते.

अनेक वर्षानंतर दावीद राजाचा मुलगा शलमोन ह्याला, देवाचे स्थायीक घर ज्याला मंदिर म्हणतील हे बांधण्याची कामगिरी देवाने दिली होती. मंदिरात लोक दरदिवशी त्यांची अर्पणे देऊ शकतील जेणेकरुन लोकांचे पाप क्षमा होतील. जरी मंदिर हे अनेकदा नष्ट करून परत बांधण्यात आले तरी या जागेवर येशू येईल आपल्या बापाची उपासना करेल.



दावीद राजा व येशू मधील 1000 वर्षाच्या काळात इस्राएली लोकांनी वारंवार देवाची आज्ञा मोडली. अनेक वर्षे, भविष्यद्वक्त्यांनी लोकांना त्यांच्या पापांपासून वळून देवाकडे येण्यासाठी सांगितले. त्यांना पूर्वीच सांगितले होते की देव "मसीहा" बनून येईल.




इस्राएली लोक हे आपल्यासारखेच होते कारण आम्ही सर्वांनी पाप केले आहे. ह्या वाईट कृत्यांना आणि विचारांना आपण पाप म्हणतो. शास्त्र सांगते की प्रत्येकाने देवाच्या विरूद्ध बंड केला आहे आणि पापमय रीतीने जीवन जगत आहेत. आपले पाप आपल्याला देवाच्या कुटुंबात भाग घेण्यापासून दूर ठेवते.

परंतु आपण त्याच्या कुटुंबाचे सदस्य व्हावे ही देवाची इच्छा आहे. देवाच्या कुटुंबात आपण कितीहि प्रयत्न केले तरी जागा मिळवू शकत नाही. परंतु देव आपल्यावर फार प्रीति करतो व आपण त्याच्या अगदी जवळ राहावे अशी इच्छा धरतो, आपल्यासाठी त्याच्याकडे विशेष योजना आहे. मानवी शर्यतीत भाग घेण्याचे देवाने ठरविले. त्याचा पुत्र, येशू, मानवी बाळ म्हणून जन्मास आला परंतु त्याला मानवी पिता नव्हता.




एके दिवशी गब्रीएल देवदूत एका कुमारीकेकडे आला जिचे नाव मरीया होते व तिचे वाग्दान योसेफ जो नासरेथचा सुतार होता त्याच्यासोबत झाले होते, देवदूताने असे सांगितले की तिला होणारे बाळ हे जगिक पित्याशिवाय होईल, व तो पापरहीत राहील व पवित्र राहील. येशूच्या जीवनातले सुरूवातीचे प्रसंग हे जे काही देवदूताने मरीयेला सांगितले होते अगदी त्याचप्रकारे होते.












येशू ख्रिस्त 33 वर्षे पापरहीत जीवन जगला. शेवटच्या तीन वर्षांत त्याने देशांसभोवती असलेल्या लोकांत त्याचा पिता देव ह्याबद्दल सांगून, लोकांनी कसे जीवन जगावे हे दाखवून, आणि मोठी अद्भुते करून व पापांची क्षमा करून आपली सेवा केली.









येशूला अटक होण्यापूर्वीच्या रात्री येशूने आपल्या शिष्यांसोबत वल्हांडणाचे भोजन घेतले. जे भोजन वरच्या खोलीत घेतले. ही प्रथा 1400 वर्षापासून चालत आली, ह्याची सुरूवात मोशेपासून झाली. परंतु आता येशूने नवीन प्रथा सुरू केली ....तो म्हणतो. की तो त्याचे जीवन जगाच्या पापाकरिता देईल. त्याच्या यज्ञ अर्पणाचे उदाहरण म्हणून त्याने भाकर व द्राक्षरस वापरला. त्याने परत देवाची योजना स्पष्ट करून सांगितली की सर्व लोकांच्या पापांकरिता त्याला क्रुसखांबावर मरणाची शिक्षा भोगायची आहे.






येशूने त्याच्या मरणाचेच भविष्य केले नाही तर त्याच्या मरणातून परत जिवंत उठण्याचे सिद्ध केले. त्याने शिष्यांना खात्री करून दिली "मी परत जिवंत उठल्यावर मी गालीलात जाईल व त्याठिकाणी तुम्हाला भेटेल" परत येशूने म्हटले "जे काही माझ्याविषयी संदेष्ट्याने लिहिले आहे ते खरे होईल."

त्यानंतर लगेच येशूला अटक करण्यात आली. ज्या येशूने वादळ शांत केले, लाजराला मरणातून उठविले व पाच हजारांना जेऊ घातले तो शिपायांना अटक करण्यापासून, मारण्यापासून, व वधस्तंभावर खिळण्यापासून थांबवू शकत होता. परंतु येशूने स्वतःला जीवे मारून दिले कारण तो तुमची आमची शिक्षा स्वतःवर घेत होता.

चौकशीच्या वेळी पिलाताने जाहीर केले की येशूने काहीच वाईट केलेले नाही परंतु लोकांच्या समाधानासाठी त्याने येशूला क्रुसखांबावर मरण्यासाठी दिले.




जेव्हा येशू मरण पावला, त्याच्या शरीराची उत्तरक्रिया जवळच्या कबरेत केली. मोठी धोंड लावून शिक्कामोर्तब केले व त्या ठिकाणी शिपायांचा पहारा लावण्यात आला कारण ज्या पुढाऱ्यांनी त्याला जीवे मारले त्यांना आता आठवले की येशूने पुन्हा जिवंत होईल असे म्हटले होते. परंतु तिसऱ्या दिवशी सकाळी, शब्बाथवारी काही स्त्रिया कबरेवर गेल्या. अचानक त्या ठिकाणी भुकंप झाला व प्रभुच्या दूताने ती धोंड बाजूला केली. दूताने स्त्रियांना म्हटले "भिऊं नका ! ......तो एथे नाही कारण त्याने म्हटल्याप्रमाणे तो पुन्हा जिवंत उठला आहे. या त्याचे शरीर कुठे ठेवले होते ते बघा....आणि आता लवकर जाऊन त्याच्या शिष्यांना सांगा की तो जिवंत उठला आहे व तो त्यांची भेट घेण्याकरिता गालीलात जात आहे."



**पा**पांकरिता येशूने दिलेल्या बलिदानाद्वारे तारण मिळविण्याकरिता आपण त्याच्यावर विश्वास ठेवण्याचे मन तयार करायला हवे. जर आपण उघडपणे जाहीर करतो की येशू आपल्या पापांकरिता मरण पावला व असा विश्वास धरतो की देवाने त्याला मरणातून उठविले तर देव, पाप क्षमेचे व आपले पाप विसरून जाण्याचे अभिवचन देतो. जेव्हा आम्ही असे करतो तेव्हा आम्ही देवाच्या कुटुंबाचे सदस्य होतो. पवित्र आत्मा आमच्या जीवनात वास करण्यास येतो व आम्हाला खिस्ती जीवन जगण्याचे सामर्थ्य देतो. एके दिवशी आम्ही देवासोबत सर्वकाळ राहण्यासाठी स्वर्गात जाणार आहोत.

**ज**र तुम्ही स्वतःचे पाप कबुल करण्याचा कधीहि विचार केला नसेल तर देवाला पापक्षमेची विनंती करा व आपले जीवन त्याचा आदर करण्याकरिता जगा. ही प्रार्थना आता का करू नये ?

**येशू , तूं देवाचा पुत्र आहे असा मी विश्वास धरतो.**

**माझा विश्वास आहे की आमच्या सर्वांच्या पापांकरिता व माझ्या पापांकरिता सुद्धा तूं या जगात आला.**

**माझा विश्वास आहे की तूं मरण पावला व परत उठला आणि आज तूं जिवंत आहेस.**

**येशू , माझ्यापापांची क्षमा कर असे मी तुला विनवितो व मला तुझ्या अद्‌भूत कुटुंबाचा सदस्य कर.**

**मी विनंती करतो की तूं येऊन मजमध्ये राहा व माझा प्रभु हो. आमेन.**

माझा विश्वास आहे ! माझा तारणारा व्हावा म्हणून मी येशूला विनंती केली.

_______________________________

(नाव ) (तारीख)

ह्याठिकाणी काही वचने दिलेली आहेत जे तुम्हाला, जो निर्णय तुम्ही घेत आहात त्याविषयी चांगल्या रीतीने समजण्याकरिता उपयोगी ठरतील.

योहान ३:१६
१ योहान ५:११,१२
योहान १:१२
रोम ३:२३
रोम ५:८
रोम ६:२३
रोम १०:९,१०.
२ करिंथ ५:१७

येशूचे तारणाचे दान मिळविल्यानंतर तुम्ही पवित्र शास्त्र (बायबल) वाचा व प्रार्थनेद्वारे देवाशी बोला. तुम्ही लवकरच त्याच्या सानिध्यात वाढाल व पूर्ण जीवन जगण्याचा आनंद घेण्यास सुरूवात कराल. त्याने आम्हाला देवाच्या अद्‌भूत कुटुंबाचे सदस्य म्हणून स्वीकारले आहे.



The Life of Christ
*Illustrated* - Marathi

*Cook Communications*
*Ministries International*

G G Enterprise
gg.amar@RMB.sril